cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२३८ | शनिवार, दि.२१ डिसेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

संपादकीय

हे चर्चासत्र नव्हे धुळवडसत्र

महामानव आणि घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरुन सध्या संसदेत जे काही घडत आहे, ते कोणालाही लाजेने मान खाली घालायला लावणारेच आहे. राजकीय पक्षांमधील स्पर्धा, मतांसाठीचे गळेकापू राजकारण आणि राजकारणात चालणाऱ्या इतर सर्व बऱ्यावाईट बाबी लक्षात घेतल्या तरीही इतकी खालची पातळी गाठली जाईल, अशी अपेक्षा नव्हती. मंगळवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भारताच्या राज्य घटनेवरील चर्चेला उत्तर देताना काही विधाने केली. काँग्रेसने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कसा अवमान वारंवार केला, यासंबंधीचे आरोप त्यांनी केले. त्यातील, १२ सेकंदांची एक व्हिडीओ क्लिप काँग्रेसने 'एक्स' या माध्यमावर पोस्ट केली आणि एक वाद निर्माण झाला.

खा.संजय राऊतांच्या घराबाहेर अज्ञातांकडून रेकी

मुंबई : नागपूरमध्ये विधानसभेचे हिवाळी अधिवेशन सुरु आहे. हे अधिवेशन विविध मुद्द्यांवर गाजत असतानाच आता मुंबईत मोठी घडामोड समोर आली आहे. शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्या घराबाहेर अज्ञातांकडून रेकी करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. यामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, संजय राऊत यांच्या भांडुपमधील मैत्री बंगल्याच्या बाहेर दोन अज्ञातांकडून रेकी करण्यात आली. सकाळी साडेनऊ वाजेच्या सुमारास हे दोन अज्ञात व्यक्ती संजय राऊत यांच्या घराबाहेर रेकी करत असल्याचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहेत.

पीकविम्यात कोट्यावधींचा घोटाळा ; कंपन्यांवर गुन्हा दाखल करा

आ.सुरेश धस यांचा गौप्यस्फोट; थेट मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर आरोप

नागपूर । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यासही राज्यात मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येवरून राजकारण तापलेले आहे. राज्याच्या हिवाळी अधिवेशनासह संसदेच्या अधिवेशनात देखील या विषय गाजला. याचप्रकरणावरून भाजपचे आमदार सुरेश धस यांनी देखील आरोप केले होते. आता त्यांनी नवा आरोप करताना, पीकविमा कंपन्यांवर

गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. धस यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतल्यानंतर गौप्यस्फोट करताना ही मागणी केली आहे.

धस यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना, जिल्ह्यातील पीकविमा योजनेत मोठा घोटाळा झाल्याचा दावा केला आहे. तब्बल सात हजार हेक्टरचा पीकविम्याचा घोटाळा झाला असून, तो एकट्या बीड झाल्याचे धस यांनी म्हटले आहे. तसेच असाच घोटाळा धाराशिव जिल्ह्यातही झाला असून तो तीन हजार हेक्टरचा असल्याचा दावाही धस यांनी केला आहे. यावेळी धस यांनी सोनपेठ तालुक्यातील माहिती समोर आणताना येथे १३ हजार १९० एकर विमा भरण्यात आला. तो परळी तालुक्यातील सीएससी सेंटरमधून भरला गेला असून तालुक्यातील शेतकऱ्यांची लूट करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या योजनेचा गैर फायदा घेण्यात आल्याचा आरोप देखील धस यांनी केला आहे. धस यांनी परळीत पीकविम्यात घोटाळा २०२३ मध्ये झाला असून तो महायुतीच्या काळात झाला आहे. तर तत्कालीन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी एका रूपयात पीक विमा योजनेचा गैरफायदा घेतल्याचा आरोप धस यांनी केला आहे. यावेळी त्यांनी धनंजय मुंडे यांचे नाव न घेता तत्कालीन कृषिमंत्र्यांनी योजनेचा गैरफायदा घेतला, असे म्हटले आहे. बाकी कोण ते पत्रकारांनी शोधावें, असेही ते म्हणाले. तसेच धस यांनी या घोटाळाप्रकरणी पीकविम्याप्रकरणी कंपनीचे अधिकारी आणि लोक जबाबदार ◀◀ पान २ वर

केंद्रीय कृषी मंत्र्यांकडे तक्रार करणार

याबाबत देशाचे कृषिमंत्री शिवराज चौहान यांच्याकडे तक्रार करणार असून देशात अशा पद्धतीने परळी पॅटर्न पीकविमा राबवावा अशी मागणी करणार असल्याचे म्हटले आहे. पीकविम्यात झालेल्या हा घोटाळा संघटीत असून याबाबत पीकविमा कंपनीवर गुन्हा दाखल झाला पाहिजे, अशी मागणी आमदार सुरेश धस यांनी केली आहे.

बीडमधील गुन्हेगारीची पाळेमुळे खणून काढणार

मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा, हत्येच्या प्रकरणाची न्यायालयीन आणि एसआयटी अशी दुहेरी चौकशी होणार

नागपूर । प्रतिनिधी

बीड, परभणी मधील घटना दुर्दैवी आहेत. या दोन्ही घटनांची सरकारने गंभीर दखल घेतली असून, बीड जिल्ह्यातील हत्येच्या प्रकरणाची न्यायालयीन आणि एसआयटी अशी दुहेरी चौकशी केली जाईल. तर परभणी मधील संपूर्ण घटनेची न्यायालयीन चौकशी केली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिली.

बीड, परभणी येथील घटनेसंदर्भात विधानसभेत झालेल्या अल्पकालीन चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. ते म्हणाले की, बीड मधील प्रकरणाची न्यायालयीन व एसआयटी मार्फत चौकशी ◀◀ पान २ वर

पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांची बदली

बीडः जिल्ह्यात निर्माण झालेला कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न आणि नुकताच संतोष देशमुख यांचा झालेला खून. या संदर्भाने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था राखण्याच्या संदर्भाने निष्क्रिय ठरलेल्या पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांच्या बदलीचे आदेश काढले आहेत. बारगळ यांना जिल्ह्यातील अनेक गैर प्रकारावर आळा घालता आला नाही. त्यातच संतोष देशमुख हे खून प्रकरण घडल्याने त्यांच्यावर सर्वत्र टीका होऊ लागली. त्यामुळेच मुख्यमंत्री फडणवीस यांनी तात्काळ निर्णय घेत पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांची तडकाफडकी उचलबांगडी केली. अविनाश बारगळ हे जिल्ह्यामध्ये पोलीस अधीक्षक म्हणून रुजू झाल्यानंतर जिल्ह्यामध्ये अनेक गैरप्रकार घडत राहिले. मात्र त्यावर बारगळ यांना नियंत्रण आणता आले नाही. जिल्ह्यात अनेक ठिकाणी चोऱ्या, मारामाऱ्यापासून धमकावणे आणि काही ठिकाणी खून पडण्याचेही प्रकार घडले.

दूध का दूध आणि पाणी का पाणी होईल–धनंजय मुंडे

नागपूरः वाल्मिक कराड यांच्यावर आरोप झाल्यानंतर गेल्या तीन दिवसांपासून धनंजय मुंडे विधीमंडळात दिसले नाहीत. अखेर शुक्रवारी त्यांनी नागपूरमध्ये पत्रकार परिषदेत घेत भूमिका स्पष्ट केली आहे. धनंजय मुंडे म्हणाले, हत्येचे समर्थन कोणीच करु शकत नाही. त्यामुळे या प्रकरणातील सर्वच आरोपी अटक झालेले आहेत. जेवढी तीव्र भावना या प्रकरणामध्ये आमची सर्वांचीच होती. त्यात आरोपी अटक झाले आहेत. एसआयटी नेमण्यात आली आहे. सीआयडी नेमल्यानंतर अगदी शेवटपर्यंत याचा तपास होणार आहे. कोण होतं काय होतं. आदल्यादिवशी जो गुन्हेगार आहे तो आणि मयताचा भाऊ एक पोलीस अधिकाऱ्यासोबत हॉटेलमध्ये चहा पित आहेत, असा व्हिडीओ समोर आलेला आहे. तो व्हिडीओही ◀◀ पान २ वर

बीड–परभणीतील मृतांना १० लाख रूपयाची नुकसान भरपाई

बीड, परभणी घटनांमधील दोन्ही मृतांच्या कुटुंबियांना दहा लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली. त्यानुसार बीडमध्ये हत्या झालेल्या सरपंच संतोष देशमुख आणि परभणीमधील घटनाक्रमात मृत सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबियांना दहा लाखांची तर शांतता प्रस्थापित करणारे परभणीचे मृत विजय वाकोडे यांच्या कुटुंबियांना पाच लाखांची मदत देण्यात येणार असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.

परभणी प्रकरणाची न्यायालयीन चौकशी

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, परभणी जिल्ह्यातील घटना अत्यंत दुर्दैवी आहे. भारताच्या संविधानाचा अपमान हा सर्व भारतीयांचा अपमान आहे. त्यामुळे हा अपमान सहन केला जाणार नाही. परभणी येथील कृत्य एका मनोरूग्णाने केले आहे. तो मनोरुग्ण असल्याचा स्पष्ट वैद्यकीय अहवालही उपलब्ध आहे. तरीही त्याची खातरजमा करण्यासाठी चार डॉक्टरांचे पथक आपण नेमले आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत सर्व राजकीय पक्षांनी तणाव कमी करण्यासाठी प्रयत्न करणे अपेक्षित आहे. या प्रकरणात कोंबिंग ऑपरेशन झाले नाही. परभणीत सकल हिंदू समाजाचा मोर्चा हा सर्वपक्षीय होता. या मोर्चात बांग्लादेशमधील हिंदूंसंदर्भात मागणी करण्यात आली होती. त्यामुळे ही हिंदू विरूद्ध दलित अशी दंगल नाही. परभणीत झालेल्या तोडफोडीत दुकाने, वाहने, सरकारी कार्यालयांचे नुकसान झाल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले. त्याचबरोबर परभणीत पोलीस अधिकारी अशोक घोरबांड यांना निलंबित करून त्यांनी वाजवी पेक्षा अधिक पोलीस बळाचा वापर केला आहे काय, याची चौकशी केली जाईल, असे त्यांनी जाहीर केले.

धाराशिव जिल्ह्यात पवनचक्की कंपन्यांची दादागिरी

शेतकऱ्यांना धमकावून करारापेक्षा अधिक क्षेत्र बळकावण्याचा प्रयत्न

नागपूर । प्रतिनिधी

जिल्ह्याच्या काही भागांत खासगी कंपन्यांकडून दीड वर्षापासून पवनचक्क्यांची उभारणीचे काम सुरू आहे. त्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी करार पद्धतीने घेतल्या जात आहेत. यात कंपन्यांकडून करारापेक्षा अधिक क्षेत्र बळकावण्याचा प्रयत्न सुरू असून, त्याला विरोध करणाऱ्यांना बाउन्सरकडून दमदाटी केली जात असल्याच्या तक्रारी शेतकरी करत आहेत.

जिल्ह्यातील लोहारा, तुळजापूर, धाराशिव तालुक्यांत गेल्या दीड वर्षापासून पवन चक्क्या उभारणीची कामे सुरू आहेत. बालाघाटच्या डोंगरावर हा परिसर असल्याने विविध ठिकाणी पवन चक्कींची उभारणी सुरू आहे. यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी कंपनीकडून करार पद्धतीने घेतल्या जात आहेत. मात्र करारात नमूद केले आहे, त्यापेक्षा अधिक क्षेत्र बळकावण्याचा प्रयत्न कंपन्यांकडून केला जात आहे. ◀◀ पान २ वर

संसद चालवायची जबाबदारी सत्ताधाऱ्यांची - सुप्रिया सुळे

दिल्ली : संसदेचे कामकाज सुरळीत चालवण्याची जबाबदारी ही सत्ताधारी पक्षाची असते. त्यांनी पुढाकार घेऊन चर्चा केली पाहिजे, पण दुर्दैवाने देशातील मायबाप जनतेला मला हे सांगावे लागेल की, यावेळी संसदेचं कामकाज सुरळीत चालवण्याची जबाबदारी ◀◀ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२० डिसेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू: १.०० क्विंटल			
	३,१५०	३,१५०	३,१५०
ज्वारी/हायब्रिड: ४४.५० क्विंटल			
	२,००१	२,८००	२,२३९
मका/लोकल: ७.०० क्विंटल			
	२,१५०	२,१५०	२,१५०
तूर : ४२.५० क्विंटल			
	७,०११	७,७५०	७,५२४
उडीद : ११.०० क्विंटल			
	६,३००	७,३००	६,७४०
बाजरी: ५.५० क्विंटल			
	२,०८१	२,९५७	२,६५२
मुग : २.०० क्विंटल			
	७,३००	७,३००	७,३००
सोयाबीन: ९९.५० क्विंटल			
	३,९०२	४,०५१	४,००६
हरभरा: १.५० क्विंटल			
	५,८००	५,८००	५,८००

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अपमानाचे पाप लपवण्यासाठी भाजपाचे फेक नॅरेटीव्ह-नाना पटोले

नागपूर । प्रतिनिधी

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी संसदेच्या प्रवेशद्वारावर धक्काबुक्की केल्याचा कोणताही व्हिडिओ नाही. गृहमंत्री अमित शाह यांनी राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केल्याने देशभरात संताप व्यक्त केला जात आहे. भाजपाच्या पोटात होते तेच ओठावर आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल भाजपाच्या मनात किती राग आहे ते उघड झाले. अमित शाहांचे हे पाप झाकण्यासाठी भाजपाकडून राहुल गांधी यांच्या विरोधात कुभांड रचून फेक नॅरेटिव्ह पसरवले जात आहे, असा हल्लाबोल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला.

विधानभवन परिसरात प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, सत्ताधारी भाजपाने लोकसभेला आखाडा बनवले आहे. सत्ताधारी पक्षाचे लोक संसदेत चर्चा होऊ देत नाहीत. देशाच्या एकतेसाठी काँग्रेस पक्षाचे दोन महत्वाचे नेते शहीद झाले. भाजपाने देश अदानीला विकण्याशिवाय दुसरे काहीही केलेले नाही. सरकार अदानीला वाचवण्यासाठी ◀◀ पान २ वर

मराठी पत्रकार परिषदेची राज्यस्तरीय बैठक संपन्न

पुणे। प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषदेची राज्यस्तरीय बैठक मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख सर यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी दि.२० डिसेंबर रोजी संपन्न झाली.

बैठकीसाठी विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे, मराठी पत्रकार परिषदेचे सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, विभागीय सचिव गणेश मोकाशी यांच्या उपस्थितीत व्दैवार्षिक अधिवेशन, आदर्श तालुका पुरस्कार वितरण सोहळा, परिषदेचे पुरस्कार,अन्य पदाधिकारी ◀◀ पान २ वर

मराठा समाजाला आरक्षण मिळेपर्यंत एकजूट कायम ठेवा - जरांगे पाटील

आष्टी । प्रतिनिधी

मराठा समाजाला आरक्षण नसल्यामुळे आपल्या लेकराबाळांचे गेल्या अनेक वर्षापासून वाटोळ झालेले आहे. आपण कष्ट करून लेकराबाळांना शिक्षण देतो मात्र त्याला आरक्षणाअभावी नोकरी लागत नाही किंवा नोकरी लागली तर त्याला बढती मिळत नाही. यासाठी २५ जानेवारी २०२५ रोजी अंतरवली मध्ये उपोषण होणार आहे. या उपोषणामध्ये सर्व कामधंदे बाजूला ठेवून एकत्रित या व समाजाला आरक्षण मिळेपर्यंत एकजूट ठेवण्याचे आवाहन मनोज जरांगे ◀◀ पान २ वर

कडा येथे संत मदन महाराज पुण्यतिथी सोहळ्यास जरांगे पाटलांची उपस्थिती

लाभांच्या योजनांची आरबीआयला चिंता!

कृषी कर्जमाफी, मोफत विजेसह लाडकी बहिणसारख्या योजनांमुळे सामाजिक सुविधांवर परिणाम

पुणे । प्रतिनिधी

भारतीय रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने (आरबीआय) आपल्या एका अहवालात शेती कर्जमाफी, मोफत वीज आणि वाहतूक यासारख्या सवलतीवरून चिंता व्यक्त केली आहे. तसेच राज्यांना सल्ला देताना, अशी योजनांवरील खर्चामुळे सामाजिक आणि आर्थिक पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या क्षमतेला बाधा येऊ शकते, असा इशारा दिला आहे.

स्टेट फायनान्सेस: अ स्टडी ऑफ बजेट २०२४–२५ या अहवालात, राज्य सरकारांनी सलग तीन वर्षात (२०२१–२२ ते २०२३–२४) सकल देशांतर्गत उत्पादनाच्या टक्केवारीनुसार एकूण वित्तीय तूट कमी केली आहे.) जीडीपी ३ टक्क्यांच्या आत ठेवला आहे. राज्यांनी महसुली तूट २०२२–२३ आणि २०२३–२४ मध्ये जीडीपी च्या ०.२ टक्क्यांपर्यंत मर्यादित ठेवली आहे. या वित्तीय तूटीमुळे राज्यांना भांडवली खर्च वाढवण्यास आणि खर्चाचा दर्जा सुधारण्यास वाव मिळाल्याचे म्हटले आहे. पण अनेक राज्यांनी चालू आर्थिक वर्षासाठी त्यांच्या बजेटमध्ये शेतकरी कर्जमाफी, शेती आणि घरांना मोफत वीज, मोफत वाहतूक, बेरोजगार तरुणांना भत्ते आणि महिलांना रोख मदत जाहीर केली आहे. अशा खर्चामुळे त्यांच्या तिजोरीवर परिणाम होऊ शकतो. असे झाल्यास सामाजिक आणि आर्थिक पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या राज्यांच्या क्षमतेत अडथळा येऊ शकतो, अशी चिंता आरबीआयने व्यक्त केली आहे. अशा योजनांमुळे अतिशय महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या या गोष्टींच्या विकासावर परिणाम होऊ शकतो. यामुळे शेतकऱ्यांची कर्जमाफी, शेती आणि घरांना मोफत वीज, मोफत वाहतूक तसेच स्वस्त सिलिंडर, तरुण आणि महिलांना रोख रक्कम देण्यावर नियंत्रण ठेवण्यास आणि ते तर्कसंगत करण्यास आरबीआयने आपल्या अहवालात राज्यांना सांगितले आहे. आरबीआयच्या अभ्यासानुसार, उच्च कर्ज–जीडीपी गुणोत्तर, थकबाकी हमी आणि ◀◀ पान २ वर

वीज कंपन्या धोक्यात

आरबीआय आपल्या अहवालात राज्यांच्या वीज वितरण कंपन्यांच्या ढासळत्या आर्थिक स्थितीबद्दलही चिंता व्यक्त केली आहे. आरबीआयच्या मते, डिस्कॉम्सची आर्थिक स्थिती राज्यांच्या आर्थिक स्थितीसाठी एक गंभीर आव्हान आहे. आर्थिक पुनर्रचना असूनही, राज्यांच्या वीज वितरण कंपन्यांवरील थकीत कर्ज २०२२–२३ मध्ये ४.२ लाख कोटी रुपयांवरून ६.८ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढले आहे. जे २०२६–१७ पेक्षा ८.७ टक्क्यांनी जास्त आहे. जी जीडीपीच्या २.५ टक्के आहे.

cmyk

अग्रलेख

हे चर्चासत्र नव्हे धुळवडसत्र

महामानव आणि घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरुन सध्या संसदेत जे काही घडत आहे, ते कोणालाही लाजेने मान खाली घालायला लावणारेच आहे. राजकीय पक्षांमधील स्पर्धा, मतांसाठीचे गळेकापू राजकारण आणि राजकारणात चालणाऱ्या इतर सर्व बऱ्यावाईट बाबी लक्षात घेतल्या तरीही इतकी खालची पातळी गाठली जाईल, अशी अपेक्षा नव्हती. मंगळवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भारताच्या राज्य घटनेवरील चर्चेला उत्तर देताना काही विधाने केली. काँग्रेसने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कसा अवमान वारंवार केला, यासंबंधीचे आरोप त्यांनी केले. त्यातील, १२ सेकंदांची एक व्हिडीओ क्लिप काँग्रेसने 'एक्स' या माध्यमावर पोस्ट केली आणि एक वाद निर्माण झाला.

बुधवारचा संपूर्ण दिवस याच वादात संसदेचे कामकाज झाले नाही. मग गुरुवारी संसदेच्या 'मकरद्वारा'त जे घडले, त्याचे पडसाद बरेच दिवस उमटत राहतील अशी शक्यता आहे. काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भारतीय जनता पक्षाच्या दोन खासदारांना ढकलले आणि त्यामुळे ते खासदार पडून जखमी झाले, असा आरोप भारतीय जनता पक्षाकडून करण्यात आला. प्रताप सारंगी या खासदारांच्या तर डोक्याला जखम झाली. त्यानंतर, हे खासदार आपल्याला संसदेत जाण्यापासून रोखत होते, असा आरोप राहुल गांधी यांनी केला. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनीही आपले गुडघे दुखावल्याचा आरोप केला. या सर्व प्रकाराचे व्हिडीओ चित्रण उपलब्ध असून ते पाहिले असता काय घडले आहे, हे प्रत्येकाला समजून येते. भारतीय जनता पक्षाने राहुल गांधी यांच्या विरोधात संसद भवन पोलिस स्थानकात तक्रार नोंदविली आहे. हा ढकलाढकलीचा आणि खासदार जखमी होण्याचा प्रकार संसदभवनाबाहेर घडला आहे. त्यामुळे या प्रसंगात ज्यांचा सहभाग आहे, त्यांच्यावर लोकसभेचे अध्यक्ष कारवाई करु शकतात, असे अनेक तज्ञांचे मत आहे. या प्रकरणात दोषी कोण, हे जर त्यांची चौकशी झाली तर स्पष्ट होईलच. या प्रकरणी व्हिडीओ फूटेज हे महत्त्वाचा पुरावा ठरणार आहे. त्यामुळे कालांतराने बऱ्याच बाबी स्पष्ट होतील. तथापि, ज्या महामानवाने भारताची घटना लिहिली, त्यांच्या नावाने हे असे प्रकार संसद परिसरात व्हावेत, हे खरोखरच निंदनीय आहे. या सर्व गदारोळात आणि गोंधळात कोणता पक्ष निर्दोष आणि कोणता दोषी हा मुद्दा सध्या बाजूला ठेवला, तरी आपल्या राजकारणाचा स्तर किती घसरला आहे, हे यातून स्पष्ट होते. कोणत्याही सुजाण नागरिकाला आता देशाच्या भवितव्याविषयी चिंता वाटण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. आजकाल संसद ही कामकाज करण्यापेक्षा ते स्थगित करण्यासाठीच अधिक प्रसिद्ध होत आहे. संसदेत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले, तेव्हापासून सर्वांना तेथे काय चालते हे प्रत्यक्ष पाहता येऊ लागले आहे. आपल्याला सर्व लोक पहात आहेत, हे समजून संसदेतील गोंधळ कमी होईल आणि खासदार अधिक समंजसपणे वागतील, अशी अपेक्षा होती. पण उलटेच घडत आहे. संसदेतील आणि संसद परिसरातील गदारोळ अधिकच फोफावला आहे. आपले लोकप्रतिनिधी खासदार कसे आणि किती बेशिस्त आहेत, याचेच दर्शन वारंवार घडत आहे. वास्तविक, हे आपल्या घटनेचे अमृतमहोत्सवी वर्ष आहे. यानिमित्ताने संसदेत जी चर्चा आयोजित केली गेली होती, ती गांभीर्याने आणि अभ्यासपूर्वक अशा प्रकारे होईल, अशी अपेक्षा होती. विरोधी पक्षांनी या चर्चासत्राची मागणी केली आणि सरकारने ती मान्य केली. पण एवढा एक सौहार्दाचा प्रसंग वगळता, लोकसभेत २ दिवस आणि राज्यसभेत २ दिवस अशा ४ दिवसांच्या चर्चेत केवळ परस्परांवर चिखलफेक, आरोप-प्रत्यारोप आणि प्रछन्न शब्दभडिमार यांचेच दर्शन घडले. त्यामुळे हे चर्चासत्र न ठरता धुळवडसत्र ठरले आहे. गुरुवारच्या प्रसंगाने तर या सगळ्यावरच कडी केली. असे घडणे हे आश्चर्यकारक अशासाठी की यामुळे मते मिळतात, हा राजकीय पक्षांचा समज मतदारांनी अनेकदा चुकीचा ठरविला आहे. हा 'नॅरेटिव्ह' प्रस्थापित करण्याचा खेळ कित्येकदा करणाऱ्याच्याच अंगलट येतो, हे देखील पुष्कळदा सिद्ध झाले आहे. कोण किती घटनाविरोधी आहे, हे कोणीही कितीदाही ओरडून सांगितले तरी मतदार ते अलीकडे फारसे मनावर घेत नाहीत, हे स्पष्ट होऊनही तेच केले जाते. मतदार शहाणा आहे. तो आपल्या देखावाबाजीला भुलणार नाही, हे माहीत असूनही राजकीय पक्ष आपल्या सवयी सोडत नाहीत. यातून ते मतदारांना किती किंमत देतात हे देखील स्पष्ट होते. आपणच लोकशाहीचे आणि घटनेचे कसे तारणहार आहोत, असा आव आणणारे राजकीय पक्षच जेव्हा याच उदात्त संकल्पनांची अशी पायमल्ली, राजकीय स्वार्थासाठी करताना पहावे लागते, तेव्हा कोणत्याही सहृदय व्यक्तीस दुःख होणे स्वाभाविक आहे. ही परिस्थिती कधीतरी सुधारेल, अशी आशा बाळगणे एवढेच सध्या सर्वसामान्यांच्या हाती आहे.

आभासी दुनियेत सावध रहा!



आपण सायबर गुन्हेगारीचा विचार करताना समाज माध्यमांचा गैरवापर हा लक्षात ठेवला पाहिजे. समाज माध्यमांचा वापर करून महिलांना आर्थिक दृष्ट्या फसवले तर जातेच सोबतच अनेक प्रकरणांमध्ये लैंगिक अत्याचार झाल्याच्या घटनांमध्ये सध्या वाढ होताना आपणास दिसते.

'वय वेडं असतं असं म्हणतात पण आपण वेड होऊ नये'' हे महत्त्वाचं इंस्टाग्राम ओळख झाली आणि त्या व्यक्तीने भेटायला बोलावलं म्हणून भेटायला गेले आणि अत्याचार झाला अशा तक्रारी पोलीस ठाण्यामध्ये वारंवार होत आहेत तसेच तोच प्रकार फेसबुकबाबत सांगता येईल हे असं का घडतं याचा सर्वांनीच विचार करावा. भाजी आणायला गेल्यावर साधी कोथिंबीर जुडी घेताना आपण पारखून घेतो तर असे मित्र जोडताना आपण पडताळणी, खात्री का नाही करून घेत. इंटरनेटची दुनिया ही आभासी जग आहे त्यात प्रत्येक व्यक्ती खरी माहिती देईलच याची खात्री नाही त्यातही गुन्हेगारी वृत्ती असणारे तर दंडुका खाल्ल्याशिवाय खरं बोलत नाही मग ते या आभासी जगात खरी माहिती देणारच नाही त्यामुळे आपण सतर्क रहाणे हाच चांगला मार्ग आहे. चित्रपटातलं ते गाणं आठवतच असेल की 'लाख छुपाओ छुप ना सकेगा असली नकली चेहरा' अर्थात मनातले भाव चेहऱ्यावर उमटल्याशिवाय राहत नाहीत. आभासी जगात तर सारं 'छुपाने' ची अर्थात लपवायची पूर्ण मुभा आहे. इथं कुणी आधार कार्डच्या आधारे आपलं खातं उघडत नाही त्यामुळे पावला पावलावर फसवणुकीचा धोका असतो. वाढती सायबर गुन्हेगारी लक्षात घेऊन आता देशात सायबर गुन्ह्यांची नोंद सुरू झाली आहे सोबतच महाराष्ट्र पोलिसांनी स्वतंत्र सायबर पोलीस ठाणे देखील प्रत्येक जिल्ह्यात सुरू केलेले आहे. सायबर गुन्ह्यांचा शोध घेण्याचे विशेष प्रशिक्षण पोलिसांना देत आहे अर्थात हा गुन्हा नोंदवल्यावर आपण सतर्क राहिलो तर गुन्हा घडणार नाही हे महत्त्वाचं. सायबर गुन्ह्याची वाढ अतिशय धक्कादायक आहे. आर्थिक फसवणुकीच्या गुन्ह्यात अनेक प्रकरणी पैसे परत मिळविण्यात पोलिसांना यश आले आहे. सायबर गुन्ह्याची तक्रार आपल्याला सायबर पोलीस ठाण्यात करता येते तसेच राष्ट्रीय सायबर गुन्हा नोंदणी पोर्टलवर देखील आपण घरबसल्या तक्रार नोंदवू शकता https://cybercrime.gov.in हा त्या पोर्टलचा पत्ता आहे. सायबर गुन्ह्याचा तपास करण्यात मदत होईल अशी अद्ययावत नॅशनल सायबर फॉरेन्सीक लॅब (तपास) दिल्लीत सुरू करण्यात आलेली आहे. देशपातळीवर जुलै २०२४ पर्यंत ७.५ (साडेसात) लाख तक्रारी प्राप्त झाल्या या सर्वाधिक तक्रारी आर्थिक फसवणुकीच्या होत्या. आपण लक्षात ठेवा सायबर गुन्हे आपणास १९३० या टोल फ्री क्रमांक वर देखील नोंदवता येतील पण तक्रार करायची वेळच येऊ नये हे उत्तम.

(प्रशांत विजया अनंत दैठणकर)

जागतिक ध्यान दिन:अध्यात्माच्या मार्गावर ध्यानाचे महत्त्व

संयुक्त राष्ट्रसंघाने २१ डिसेंबर हा 'जागतिक ध्यान दिवस' म्हणून घोषित केला आहे, जो मानवतेच्या सेवेसाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. या उपक्रमाचा उद्देश जागतिक स्तरावर ध्यानाचे महत्त्व ओळखून ते लोकांच्या दैनंदिन जीवनाचा एक भाग बनवणे हा आहे. ध्यानाचा सराव केल्याने केवळ वैयक्तिक जीवनातच सकारात्मक परिणाम होत नाहीत, तर ते समाज आणि समुदायामध्ये शांतता, सौहार्द आणि संतुलनास प्रोत्साहन देते.

ध्यानाद्वारे आपण आपल्या आंतरिक शक्तींना जागृत करू शकतो, ज्यामुळे आपले जीवन केवळ निरोगी आणि संतुलित बनत नाही, तर आपण शांत, संवेदनशील आणि उदात्त समाजाच्या स्थापनेसाठी एकत्रितपणे योगदान देऊ शकतो. बदल हा जगाचा नियम आहे. जग सतत बदलत असते. अज्ञान आणि अंधाराने व्यापलेल्या मानवी जीवनात ध्यानधारणा जीवनाचा एक नवीन मार्ग आणते. आज प्रत्येक माणसाचे मन बाहेरच्या जगात भरकटले आहे. पण आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक समस्येचे समाधान आपल्यातच असते. जेव्हा आपण ध्यानाद्वारे अंतर्मुख होतो तेव्हा आपण स्वतःला शांती, प्रकाश, तेज, ऊर्जा, दिव्य स्वरूप आणि आत्मा या स्वरूपात स्थापित करू शकतो.

आज आपण हे जग समजून घेतो, पण स्वतःला आपल्या खऱ्या रूपात समजून घेऊ इच्छित नाही. जर स्व-प्रेरणेची गरज असेल, तर तुमची क्षमता जाणून घेणे महत्त्वाचे आहे. राजयोग ध्यानामध्ये आपण स्वतःला आणि देवाला त्यांच्या खऱ्या रूपात जाणून घेण्याचा प्रयत्न करतो, जे आपल्याला आत्म-ओळख आणि आत्म-साक्षात्काराच्या मार्गावर घेऊन जाते.

राजयोग ध्यान केवळ खऱ्या आत्म्याची ओळख करून देत नाही तर मनाला परमपिता, परमात्मा यांच्याशी जोडते. ईश्वराकडून दैवी शक्ती आणि प्रेरणा प्राप्त करण्याचे हे माध्यम आहे. भगवंताच्या स्मरणाने कर्म केल्याने कर्मही श्रेष्ठ होतात. राजयोग ध्यान मनाला आंतरिक शांती आणि स्थिरता प्रदान करते आणि मानवी जीवन संतुलित आणि समाधानी बनवते.

हे ध्यान वर्तन शांत, उदात्त, दैवी आणि उदात्त बनवून नातेसंबंध सुधारते. मनातील अशुद्धता दूर करते.

हातोड्याने दगड कोणी तोडला तर तो तुटतो, पण ध्यान ही एक गुरुकिल्ली आहे जी दगडाला कलाकुसरीत रूपांतरित करते.

राजयोग ध्यानामुळे सत्यता, शुद्धता, त्याग, सहिष्णुता, संयम, दया, करुणा आणि सेवा या आत्म्याचे मूलभूत गुण जागृत होते आणि मानवतेला देवत्वाकडे नेले जाते. ध्यान साधना केल्याने, आत्मा स्वतःचा मित्र आणि स्वतःचा प्रिय बनतो आणि स्वतःचा अभिमान वाटतो. यामुळे आत्म्याला गुणांचा अवतार म्हणून अनुभव येतो. ध्यान मानवी जीवनाला तणाव, भीती आणि चिंता यापासून मुक्त करते. हे वर्तमानावर लक्ष केंद्रित करण्याची संधी देते. नकारात्मक आणि हीन भावना दूर करून वाढ सर्जनशील बनवते. हे हृदय गती, हृदय गती आणि रक्तदाब नियंत्रित करते. आजच्या व्यस्त जीवनात शांत झोपेसाठी ध्यान आवश्यक आहे. यामुळे चिंता, वेदना आणि हृदयरोग आणि कर्करोग यांसारख्या आजारांपासूनही आराम मिळतो. एकाग्रता वाढवण्यासाठी, मनोबल मजबूत करण्यासाठी आणि व्यसनांपासून आणि गुन्हेगारी प्रवृत्तींपासून जीवन मुक्त करण्यासाठी हे उपयुक्त आहे. अध्यात्माच्या मार्गावर चालण्यासाठी ध्यानधारणा अत्यंत आवश्यक आहे. जीवनात आनंद, शांती, आनंद, पवित्रता आणि आत्मीयता आणण्यासाठी राजयोग ध्यानाचा अभ्यास करण्याचा संकल्प करा.

बालाजी बचाटे
प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय,माजलगाव.

भाजपचा,शहांच्या तोंडून आंबेडकर दोष समोर आला-अजिंक्य चांदणे

बीडमध्ये अमित शहा यांचा पुतळा जाळून निषेध

बीड । प्रतिनिधी

भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा आंबेडकर द्वोष अमित शहांच्या तोंडून देशाच्यासमोर आला. अशी तोफ डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे अजिंक्य चांदणे यांनी व्यक्त केली. दरम्यान परभणी येथील सोमवानाथ सुर्यवंशी या युवकांच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या पोलीस अधिकाऱ्यावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी आंदोलन कर्त्यांनी केली.

बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे शुक्रवार (ता.२०) रोजी डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाकडून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा प्रतिकात्मक पुतळा जाळून निषेध नोंदविण्यात आला. यावेळी अजिंक्य चांदणे म्हणाले की,राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची विचारधारा ही आंबेडकर द्वोषी असल्याचे देशाला आता माहीत झाले आहे. देशाच्या सर्वोच्च सभागृहात संघ प्रणित भाजपचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल अवमानजनक भाष्य केले होते. त्यांच्या या बेताल वक्तव्याचा अवघ्या देशात निषेध नोंदविला जात आहे.अमित शहा संविधानामुळे गृहमंत्री झालेत, असे असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल एवढा तिरस्कार का? त्यामुळे अमित शहा यांना त्या पदावर राहण्याचा नैतिक अधिकार नाही. अशा व्यक्तीला गृहमंत्री पदावरून हटविले पाहिजे. कारण देशाचा गृहमंत्री असताना असे बेताल वक्तव्य करणे अशोभनिय आहे. त्यामुळे आज डेमोकॉटिक पार्टी ऑफ इंडिया कडून आम्ही त्यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याचे दहन करून त्यांच्या बेताल वक्तव्याचा निषेध नोंदवित आहोत अशी तोफ डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी डागळली. यावेळी सुभाष लोनके,सुनिल पाटोळे, बाळासाहेब दोडके, यांच्यासह डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

मुंबई काँग्रेसची मंत्रालयावर तीव्र निदर्शने

मुंबई । प्रतिनिधी

भाजपा कार्यकर्त्यांनी मुंबई काँग्रेस कार्यालयावर केलेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ मंत्रालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात आली. भाजपाच्या गुंडगिरीचा निषेध करत, अमीत शहा यांच्या राजीनाम्याची मागणी करत, जयभीमच्या नाऱ्यांनी मंत्रालय परिसर दणाणून गेला होता.

गुरूवारी १९ डिसेंबरला भाजपाच्या सुमारे ४० गुंड कार्यकर्त्यांनी मुंबई काँग्रेस कार्यालयावर भीषण हल्ला केला. काठ्या, पेव्हर ब्लॉकने हल्ला करत तोडफोड केली. काँग्रेसच्या महिला पदाधिकाऱ्यांना घेरून विनयभंग करत बेदम मारहाण केली. या हल्ल्याच्या निषेधार्थ मुंबई काँग्रेसच्यावतीने मंत्रालयावर निदर्शने केली गेली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान करणाऱ्या अमित शाहांचा धिक्कार अमित शहा इस्तिफा दो भाजपची गुंडगिरी बंद करा बीड-परभणी प्रकरणातील दोषींवर कारवाई करा सोमनाथ सुर्यवंशीला न्याय मिळायलाच हवा, असे नारे देत मुंबई काँग्रेसचे कार्यकर्ते मंत्रालयाच्या गेटवर धडकले. घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. मुंबई काँग्रेसचे उपाध्यक्ष व संघटन प्रभारी प्रणिल नायर, कोषाध्यक्ष संदीप शुक्ला, मागासवर्गीय विभागाचे अध्यक्ष कचरू यादव, महेंद्र मुणगेकर, अशोक सुत्राळे, अजंता यादव, युवक काँग्रेसचे अध्यक्ष अखिलेश यादव, प्रद्युम्न यादव, नीती महाडीक, किशोर सिंग, बाळा सरोदे, इव्हन डिसूझा, या पदाधिकाऱ्यांसहित असंख्य कार्यकर्त्यांना निर्दशनं करताना अटक झाली.

पान १ वरून...

पीकविम्यात कोट्यावधींचा घोटाळा ;

आहेत. त्यांचे कनेक्शन थेट तत्कालीन कृषिमंत्र्यांशी असावा. याबाबत पोलिसांत एक तक्रार दाखल झाली आहे. तर हे घोटाळे २२ सीएससी सेंटरमधून झाले आहेत. जे परळी तालुक्यातील आहेत. तर तीन हजार हेक्टरवरील जो पीकविमा भरला गेला आहे. तो धाराशिवमध्ये भरला गेला असून शेतकरी मात्र परळी तालुक्यातले आहेत. तर विमा हा महावितरणाच्या जमिनीवर देखील भरण्यात आल्याचे उघड झाल्याचे धस यांनी म्हटले आहे.

धाराशिव जिल्ह्यात पवनचक्की

अधिक क्षेत्र बळकावण्यास विरोध केला तर कंपन्यांच्या बाउन्सरकडून शेतकऱ्यांना दमदाटी, धमकीही देण्याचे प्रकार वाढले आहेत, अशा तक्रारी काही शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केल्या आहेत. दोन दिवसांपूर्वी एका गावात कंपन्यांचे कर्मचारी व बाउन्सरकडून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यानंतर कंपन्यांवर कारवाईच्या मागणीसाठी काही संघटनानी आंदोलनाचा इशारा दिला असून धाराशिवचे आमदार कैलास घाडगे पाटील यांनी विधानसभेत हा प्रश्न उपस्थित करून कंपन्यांची दादागिरी थांबविण्याची मागणी केली आहे.

दूध का दूध आणि पाणी

सर्व चॅनल्सवर पाहिलेला आहे. या सर्व गोष्टी तपास यंत्रणेने काढणे गरजेचे आहे. या प्रकरणात मकोका लावण्याच्या बाबतीत मुख्यमंत्री बोलले आहेत. मकोका लावायचा असे प्रकरण बीड जिल्ह्यात आहेत. त्याही प्रकरणात मकोका लागला पाहिजे, या भूमिकेचा मी आहे. आता मुख्यमंत्र्यांनी या गोष्टीवर निवेदन केलेले आहे. त्यामुळे स्वाभाविक यामध्ये सर्वांचे समाधान झालेले आहे. या प्रकरणाला माझ्याशी जोडणे आणि माझ्यावर आरोप करणे या सदनामध्ये अनेकदा असे प्रकार घडलेले आहेत. शेवटी पोलीस तपासणार आहेतच. पोलीस यंत्रणा तपास करत आहे. त्यांनी ही केस देखील सीआयडीकडे दिलेली आहे. या सर्व प्रकरणात दूध का दूध आणि पाणी का पाणी होणार आहे, असेही मुंडे म्हणाले. पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले, विरोधी पक्ष नेत्यांनी काय बोलावे हे मला सांगता येत नाही. पण त्यांनी हे सांगितले असते की, वाल्मिक कराड नेमके नागपुरात कुठे आहे? तर तेही काम पोलिसांनी केले असते. त्यांनाही अटक केली असती. या आरोपींनी ज्या पद्धतीने संतोष देशमुख यांची हत्या केली, त्यांना फाशी झाली पाहिजे. ही माझी स्पष्ट भूमिका आहे.

बीडमधील गुन्हेगारीची

करण्याबरोबर जिल्हा पोलीस अधिक्षकांची बदली करण्यात येईल. या प्रकरणातील दोषींवर मकोका अंतर्गत कारवाई करून बीड जिल्ह्यातील भूमाफिया, वाळूमाफियांसह इतर प्रकारच्या गुन्हेगारीची पाळेमुळे खणून काढू, असा निर्धारही विधानसभेत व्यक्त केला. पुढे बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, बीड येथील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी मोहीम हाती घेणार असून चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे. बीडमध्ये आवादा ग्रीन एनर्जी कंपनीने गुंतवणूक केली आहे. या कंपनीची कामे आम्हालाच द्या किंवा खंडणी द्या अशी मानसिकता काहींची तयार झाली आहे. त्यामुळे बीड प्रकरणातील मास्टरमाईंड कोणीही असला तरी त्याच्यावर कारवाई केली जाईल. या प्रकरणात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग असणाऱ्यांवर देखील मकोका अंतर्गत कारवाई करण्यात येईल. बीड जिल्ह्यातील पोलीसांनी देखील योग्य कारवाई करावी असे आदेश देत गुन्हे दाखल करताना वस्तुस्थिती तपासावी, असेही यावेळी त्यांनी सांगितले.

मराठा समाजाला आरक्षण मिळेपर्यंत

पाटील यांनी केले. ते शुक्रवारी दि. २० डिसेंबर रोजी कडा येथील संत मदन महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त उपस्थित होते. यावेळी संस्थानच्या वतीने हभप बबन महाराज बहिरवाल यांनी त्यांचे स्वागत केले. पुढे बोलताना जरांगे पाटील यांनी सांगितले की, वारकरी संप्रदायात सर्व जाती धर्माचे लोक गुण्यागोविंदाने नांदत असतात. अन्यायाच्या विरोधात लढणे ही वारकरी संप्रदायाची शिकवण आहे. आणि हीच शिकवण मराठा समाजाने घेऊन आरक्षणाची लढाई लढण्याचे आवाहन त्यांनी केले. आपला समाज सुखी व्हावा यासाठी मी मरायला देखील तयार आहे. गोरगरिबांच्या लेकरासाठी, आरक्षणासाठी, वंचित पिढीसाठी ही लढाई असून या लढाईमध्ये मी विजय मिळविणारच असल्याचा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. आपली लेकरं म्हणजे आपले आयुष्य आहे. आपले लेकरू आपल्यासाठी महत्त्वाचे आहे. म्हातारपणीचा आधार हे लेकरुच असतात. मग त्याच लेकराच्या भविष्यासाठी आपण हा लढा जिद्दीने हिमतीने व आत्मविश्वासाने लढू व जिंकून दाखवू असा विश्वास तुम्ही जर मनात ठेवला तर नक्कीच मराठा समाजाला या आरक्षणाच्या लढाईत यश मिळेल. तुम्ही कष्ट करून लेकराबाळांना शिकवता पण आरक्षणामुळे नोकरी मिळत नाही. तुम्ही शेतीमध्ये कष्ट करता. लेकरबाळाचे आयुष्य आपल्यासारखे मोलमजुरीत व कष्ट करण्यात जाऊ नये यासाठी करता मग ती लेकरं शिकून सुशिक्षित बेरोजगार होऊन पुन्हा आपल्या सारखेच वाईट दिवस त्याच्या नशिबी न येण्यासाठी आरक्षण मिळणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी येत्या २५ तारखेला अंतरवली सराटीमध्ये मोठ्या प्रमाणात समाज बांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन त्यांनी केले. सध्या सरकार लाडकी बहीण योजनेसाठी पंधराशे रुपये देत आहे, हे पैसे तुम्हाला आयुष्यभर पुरणार आहे का असा सवाल उपस्थित करत आरक्षण हे तुम्हाला पिढ्यानपिढ्या आणि आयुष्यभर पुरणार आहे. त्यासाठी पंधराशे रुपये महत्त्वाचे नसून आरक्षण महत्त्वाचे आहे. त्यासाठी सर्व समाजाने रस्त्यावर उतरण्याची गरज असल्याचे प्रतिपादन जरांगे पाटील यांनी केले. मराठा समाजाने आरक्षणाच्या लढाईत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. कोण आले कोण नाही आले हे पाहायचे नाही. कोणाची वाट पाहू नका समाजाचे दुःख वाटून घेण्यासाठी एकजूट दाखवा. २५ जानेवारीच्या आंदोलनासाठी गावागावात बैठका घ्या व एक दिवस समाजासाठी देऊन गोरगरीब लेकरांच्या आयुष्यात सुखी समाधानाचे दिवस आणण्यासाठीच्या लढ्यात सहभागी होण्याचे आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी केले.

मराठी पत्रकार परिषदेची

नियुक्त्या बाबत महत्वपूर्ण चर्चा करून निर्णय घेण्यात आले. यावेळी पिंपरी चिंचवड पत्रकार संघाच्या वतीने अध्यक्ष अनिल वडघुले, सागर सुर्यवंशी, संतोष गोतावळे, विनय सोनवणे यांनी सर्वांचा यथोचित सत्कार करुन स्वागत केले.

डॉ.बाबसाहेब आंबेडकरांच्या

नौटंकी करत आहे. मोदी अदानींचे काय संबध आहेत ते जगजाहीर आहे. काँग्रेसने अदानी प्रश्नावर चर्चेची मागणी केल्याने सत्ताधारी भाजपाकडून खोट्या कथा रचून राहुल गांधी व काँग्रेस पक्षाला बदनाम केले जात आहे. राहुल गांधी यांना नरेंद्र मोदी किती घाबरतात हे यावरून स्पष्ट होते. भारत जोडो यात्रेत नक्षलवादी विचाराच्या संघटना होत्या या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विधानावर विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना नाना पटोले म्हणाले की, राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली भारत जोडो यात्रा महाराष्ट्रात आली तेव्हा देवेंद्र फडणवीस हेच गृहमंत्री होते. त्यांच्याकडे अशी काही माहिती होती तर त्याचवेळी त्यांनी कारवाई करायला हवी होती. कारवाई न करणारे फडणवीस अकार्यक्षम गृहमंत्री आहेत असे म्हणायचे का. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, राहुल गांधी व भारत जोडो यात्रेची लोकप्रियता भाजपाला सहन होत नाही म्हणून भाजपाकडून असा अपप्रचार केला जातो. भाजपाच्या गुंडांनी मुंबई काँग्रेसच्या कार्यालयावर हल्ला केल्याच्या निषेध करण्यासाठी काँग्रेससह महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधान भवन परिसरात जोरदार घोषणाबाजी करत भाजपाच्या गुंडगिरीचा निषेध केला.

संसद चालवायची जबाबदारी

पार पाडण्यात सरकार अपयशी ठरले. असा खोचक टोला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी भाजपाला लगावला. संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचा शुक्रवारचा शेवटचा दिवस पण भाजपाच्या भूमिकेमुळे संसदेचे कामकाज झाले नसल्याच्या पार्श्वभूमीवर सुप्रिया सुळे यांनी दिल्लीत प्रसारमाध्यमांशी बोलताना स्पष्ट केले. सुप्रिया सुळे पुढे बोलताना म्हणाल्या की, अधिवेशनात राज्य, देश आणि परराष्ट्र मंत्रालय यांच्याशी संबंधित विषयांवर चर्चा करावी यासाठी आम्ही संसदेत जातो. पण जेव्हा गदारोळ होतो आणि चर्चाच होत नाही, त्यावेळी खूप अस्वस्थ वाटते. एका सशक्त लोकशाहीमध्ये विरोधक आंदोलन करत असतात, जो त्यांचा अधिकारही आहे. पण यंदाच्या अधिवेशनात सत्ताधारीही आंदोलन करताना दिसले. मतं वेगळी असू शकतात, त्यात काही गैर नाही पण एका सशक्त लोकशाहीत संसदेमध्ये चर्चा व्हायलाच हवी अशी भूमिका स्पष्ट केली. पुढे बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, काँग्रेस कार्यालयावरील हल्ल्याची दृश्य अतिशय अस्वस्थ करणारी होती. महाराष्ट्रात अशी गुंडागर्दी आम्ही कधीही पाहिली नाही. आम्ही अशी गुंडागर्दी खपवून घेणार नाही. महाराष्ट्रात कायद्याचे राज्य आहे की नाही, असा संशय व्यक्त केला.

लाभांच्या योजनांची

वाढत्या अनुदानाचा बोजा यामुळे राज्यांनी वाढ आणि भांडवली खर्चावर खर्चाचा दर्जा सुधारण्याची आवश्यक आहे. तथापि, राज्यांची एकूण थकबाकी मार्च २०२४ अखेर २८.५ टक्क्यांवर आली आहे. मार्च २०२१ अखेर ती जीडीपीच्या ३१ टक्के होती. जी कोरोना कालावधीतील जीडीपीपेक्षा अधिक आहे.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार, दि.२१ डिसेंबर २०२४

नायलॉन मांजा विक्री खरेदीवर बंदी; उच्च न्यायालय खंडपीठाचा आदेश

जालना । प्रतिनिधी

नायलॉन मांजाचा वापर ठरतोय जीवघेणा, नायलॉन मांजाचा वापर करण्यास बंदी करण्यात आली अशीजालना पोलीस दलाकडुन आवाहन करण्यात येत आहे.

मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथील दाखल याचिका क्रमांक ०८/२०२० मध्ये मा. न्यायालयाने पतंग उडविण्यासाठी वापरण्यात येणारा नायलॉन मांजा खरेदी विक्री करणारे, साठा करणारे दुकानदार व पतंग उडविण्यासाठी त्याचा वापर करणारे व्यक्ती विरुध्द कायदेशीर कार्यवाही करणे बाबत कळविलेले आहे. पतंगबाजीसाठी वापरल्या जाणा-या नायलॉन मांजामुळे मोठ्या प्रमाणावर मानवी व प्राणी पक्ष्यांची जिवीत हानी होत असल्याने जालना पोलीस दलाचे वतीने जगजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. जालना जिल्हा व शहरात नायलॉन प्लास्टिक सिंथेटिक धाग्यापासुन बनविलेला मांजा साठवणारे खरेदी विक्री करणारे दुकानदार तसेच वापर करणारे लोकांची गोपनिय माहीती काढुन कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी विशेष पथक स्थापन विशेष पथक स्थापन करण्यात आलेले असुन प्रभावी कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे कुणीही नागरीक नायलॉन मांजा तयार करणार नाही किंवा त्याचा वापर करणार नाही. नायलॉन मांजा साठा वापर करतांना मिळुन आल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

महापुरुषांचा अवमान करणाऱ्या शहांनी गृहमंत्री पदाचा राजीनामा द्यावा -बोराडे

जालना । प्रतिनिधी

संसदेत संविधानावर सुरू असलेल्या चर्चेदरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विषयी केलेल्या विधानाच्या निषेधार्थ मंठा येथे जिल्हाप्रमुख ए.जे. बोराडे यांच्या नेतृत्वाखाली आंबेडकरी जनतेने तसेच नगरसेवक व विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी तीव्र घोषणाबाजी करत निषेध व्यक्त केला. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केल्यानंतर गृहमंत्री अमित शहा यांचा निषेध व्यक्त करताना ए.जे.बोराडे म्हणाले की, अमित शहा यांना सत्तेचा माज चढला असून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाचा देशातच नव्हे तर जगात आदर केला जातो. अशा या महान संविधानाबद्दल अमित शहा यांनी केलेल्या वक्तव्याबद्दल जनता त्यांना कदापिही माफ करणार नाही. त्यांच्या वक्तव्याचा संपूर्ण

जगात निषेध व्यक्त होत आहे. त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी श्री बोराडे यांनी यावेळी केली. भंते संघरक्षित यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. अमित शहा यांनी केलेल्या वक्तव्याबद्दल देशाची माफी मागावी अशी मागणी भीमशक्तीचे जिल्हाध्यक्ष प्रकाश घुले व आसाराम साबळे यांनी केली. यावेळी संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अमित शहा हाय हाय, अमित शहांचे करायचे काय खाली मुंडके वर पाय, माफी मांगो माफी मांगो, अमित शहा माफी मांगो, संविधानाचा विजय असो अशी जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी जिल्हाप्रमुख ए.जे.बोराडे तसेच नगरसेवक व पदाधिकाऱ्यांनी तहसीलदार श्रीमती सोनाली जोंधळे यांना निवेदन दिले. यावेळी भंते संघरक्षित, नगरसेवक अरुण वाघमारे, भीमशक्तीचे जिल्हाध्यक्ष प्रकाश घुले, माजी सभापती संतोष वरकड, बालासाहेब बोराडे, जे.के. कुरेशी, नितीन राठोड, अचित बोराडे, प्रदीप बोराडे, बाजभाई पठाण, विकास सूर्यवंशी, उबेद बागवान, शरद मोरे, श्रीमती सारिका वरणकर, आसाराम चोरमारे, गंगाराम गवळी, आसाराम साबळे, सुरेश वाव्हळे, अशोक अवचार, रंगनाथ वटाणे, धोंडोपंत मानवतकर, दिगंबर बोराडे, भीमराव वाघ, विलास काऊतकर, विजेश वाघमारे, अंबादास घायाळ, मारुती खनपटे, नानासाहेब बोराडे, प्रताप जाधव, धम्मा वाघमारे, करण वटाणे, पवन वाघमारे, अक्षय दीप वाघमारे, उद्धव सरोदे, पप्पू दायमा, समाधान शिंदे, नंदकिशोर प्रधान, मोसिन कुरेशी, जिजाभाऊ देशमाने, महेंद्र मोरे, गितेश वाघमारे, स्वप्निल गोंडगे, स्वप्निल खंदारे यांच्यासह शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

जय जवान माध्यमिक विद्यालयात राष्ट्रसंत गाडगे बाबा यांचा स्मृतिदिन साजरा

वडवणी । प्रतिनिधी

आज रोजी दि.२० डिसेंबर २०२४ वार शुक्रवार रोजी जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कवडगाव बु.तालुका वडवणी जिल्हा बीड येथील विद्यालयात थोर महान राष्ट्रसंत गाडगे बाबा महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य श्री.देवराम गोगा सारोक्ते सर यांच्या हस्ते त्यांच्या पावन प्रतिमेचे पूजन हार व पुष्प अर्पण करून करण्यात आले. सदरील कार्यक्रम मध्ये विद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य सर यांनी सर्व विद्यार्थ्यांना राष्ट्रसंत गाडगे बाबा स्मृतिदिन निमित्त मार्गदर्शन करताना राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या महान अशा कार्यबद्दल माहिती दिली. त्या मधुन बाबांनी संपुर्ण आयुष्य जगत असताना आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले, स्वच्छता पाळावी याचे महत्त्व,अंधश्रद्धा निर्मूलन, माणसाने माणूसपण जपले पाहिजे अशा अनेक गोष्टींची माहिती विद्यार्थ्यांना आपल्या भाषणातून दिली. त्याच प्रमाणे विद्यालयातील शिक्षक शिक्षकेत्तर वृंद यांनीही आपले मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच विद्यालयातील अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनीही या कार्यक्रमा निमित्त आपले मनोगत व्यक्त केले. तसेच या कार्यक्रमासाठी गावातील प्रतिष्ठित

नागरिक, ज्येष्ठ नागरिक,शिक्षणप्रेमी, पालक वृंद, माजी विद्यार्थी नागरीक उपस्थित होते.तसेच विद्यालयातील घाडगे सर, टले सर, हांगे सर, मुंडे सर, चोपडे सर, येवले सर,तौर मॅडम, गोदरे , ससाणे, पाखरे, काळे आदी सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद,विद्यालयातील सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी सर्व उपस्थित होते. आणि शेवटी सांस्कृतिक विभाग प्रमुख चोपडे सर यांनी कार्यक्रमाचा समारोप करत सदरील कार्यक्रम संपन्न झाला.

वाल्मीक कराड यांच्यावरती खोटे गुन्हे मागे घ्या; चुंबळी गावचे सरपंच व ग्रामस्थांची मागणी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील चुबळी सरपंच व समस्त गावकरी यांच्या वतीने वाल्मीक कराड यांच्यावरती खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे तो तात्काळ मागे घेण्यात यावा यासाठी मा.तहसीलदार डि.बी.निलावड, आणि पाटोदा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जाधव यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनात वाल्मीक कराड यांच्या मार्फत चुंबळी गावांमध्ये बरेच विकासाची कामे अडल्या नडलेल्या मदतीस कारभार करत आहे. गोरगरीब मुलीच्या लग्नासाठी सहकार्य तसेच कधीच जाती पातीचे राजकारण न करता सर्व समाजात बांधीलकी राहिलं असेच त्यानी काम केले.परंतु काही लोकांनी त्यांच्यावरती खोटे आरोप करून बदनाम करण्याचा प्रयत्न केलेला आहे. असे निवेदनात नमूद केलेला आहे. पुढे असे नमूद केले आहे की चुबळीचे सरपंच व ग्रामस्थांच्या मागणीला मान देऊन सदरील गुन्हे मागे घेण्यात यावे अशी विनंती केली अन्यथा चुंबळी गावातून लोकशाही मार्गाने आंदोलन उभा करण्यात येईल प्रति मा.पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन पाटोदा,मा.पोलीस अधिक्षक बीड,मा.जिल्हाधिकारी बीड यांना देण्यात आले आहे.या निवेदनावर प्रविण पवळ,शंकर पवळ, प्रफुल

पवळ, विनोद पव्हणे, भागवत सानप,सागर पानगे, बापुराव पवळ, संभाजी पवळ,तामावे ढोले, तुकाराम पवळ,मोहन सोनवणे, विकास सिरसाठ, विलास नागरगोजे, महादेव पवळ, तुकाराम खंडागळे, भगवान पव्हणे,सुदाम ढोले,बाळु पवळ,दादा पव्हणे, अनिल गोंदकर,नरहरी पवळ इत्यादी सह्या निवेदनावर आहे.

अंबड येथील महसूल सेवकाची दुचाकी केली लंपास;चोर सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद

अंबड । प्रतिनिधी

अंबड- जालना रस्त्यावर अंबड तहसिल कार्यालयासमोरील पाटील फायनान्स दुकानासमोर उभी असलेली महसूल सेवकाची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना रात्री ७.४० वाजता घडली.

यासंदर्भात अधिक माहिती अशी की, अंबड तहसील कार्यालयात कार्यरत असलेले महसूल सेवक सोमनाथ सरफळे हे आपली होंडा कंपनीची मोटर सायकल (एमएच २१ बिडी ०७४४) तहसील समोरील पाटील फायनान्स शॉपसमोर हँडल लॉक करुन उभी करुन कार्यालयीन कामासाठी दुपारी ३ वाजेच्या दरम्यान जालना येथे गेले होते. काम आटोपून ते रात्री ८-३० वाजेच्या दरम्यान अंबडला परत आले असता त्यांना पाटील फायनान्ससमोर उभी केलेली आपली मोटर सायकल आढळून आली नाही. त्यामुळे त्यांनी इतरत्र आपल्या मोटर सायकलचा शोध घेतला मात्र त्यांना मोटर सायकलचा कुठेही सुगावा लागला नाही. त्यानंतर त्यांनी आपली मोटर सायकल चोरी गेल्याबाबत अंबड पोलीस स्टेशनला लेखी तक्रार दिली आहे.

दरम्यान, मोटर सायकल चोर हा सायंकाळी ७:४० वाजता सदर मोटर सायकलचे हँडल लॉक तोडून मोटर सायकल स्टार्ट करुन घेऊन जात असतांना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चोर कैद झाल्यामुळे पोलिसांना लवकर तपास लागण्याची शक्यता आहे आहे. या घटनेचा अधिकारी तपास अंबड पोलीस करत आहेत.

अँटी करप्शन ब्युरोऑफ पोलीस प्रोटेक्शन इंडिया टीम चे २२ डिसेंबरला संघटनात्मक मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा-विष्णू सव्वाशे

शिरूर कासार । प्रतिनिधी

राष्ट्रीय एकात्मतेचे मूल्य संवर्धन साठी अँटी करप्शन क्राइम कंट्रोल ब्युरो ऑफ इंडिया टीमचे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय असलम हुसेन शेख रविवार दि. २२ डिसेंबर रोजी एक वाजता संगीत सूर्य केशवराव भोसले संगीत महाविद्यालय सिद्धेश्वर चौक बीएसएनएल ऑफिस जवळ शिरूर कासार उपस्थित राहणार आहेत तालुक्यातील सर्व स्वयंसेवी युवक युवतींनी या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा असे अँटीकरप्शन ब्युरो ऑफ पोलीस प्रोटेक्शन इंडिया टीमचे जिल्हा निरीक्षक एन डी मिसाळ साहेब जिल्हाध्यक्ष विष्णू सव्वाशे, लक्ष्मण पाटोळे साहेब यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे . निती आयोग भारत सरकार द्वारे पणजीकृत रजिस्टर असलेली अँटी करप्शन ऑफ ब्युरो इंडिया टीम पोलीस प्रोटेक्शन ही संस्था प्रमाणित असून राष्ट्रीय संपत्तीची जोपासना,स्वच्छ भारत अभियान, मानवीहक्क कायदा,भ्रष्टाचार मुक्त भारत करणे आणि नॅशनल महामार्ग सुरक्षा पर्यावरण इत्यादी सह अनेक कर्तव्य पार पाडण्यासाठी या टीमचे तालुकास्तरीय संघटन होणार आहे यासाठी अमूल्य असे मार्गदर्शन ऐकण्यासाठी स्वयंप्रेरणे समाजसेवा करणाऱ्या इच्छुक युवक युवतीने या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा आणि भारत मातेसाठी योगदान द्यावे यासाठी उपस्थित राहण्याचे कळवले आहे प्रसंगी राष्ट्रीय अध्यक्ष अभिजीत इंगळे,अहिल्या नगरचे अध्यक्ष बाळासाहेब आंधळे,अहिल्या नगरचे महिला अध्यक्ष जयश्रीताई ससाने, सुरेश जाधव,संजय लहाने,सुरेश गायकवाड, रामकिसन तापडिया महाराज, हेही उपस्थित राहणार आहेत तालुक्यातील सर्व जनतेने या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष विष्णू सव्वाशे यांनी केले आहे.

अपर जिल्हादंडाधिकारी यांचे कलम ३७ (१) व (३) अन्वये आदेश जारी

जालना । प्रतिनिधी

जिल्ह्यात दि.२५ डिसेंबर २०२४ रोजी ख्रिसमस (नाताळ) साजरा होणार आहे. या दिवशी चर्चमध्ये विशेष प्रार्थना व आनंदोत्सव साजरा केला जातो. तसेच दि. ३१ डिसेंबर २०२४ हा वर्षाचा शेवटचा दिवस तर दि. १ जानेवरी २०२५ रोजीचा दिवस हा नुतन वर्षाचे स्वागत म्हणुन साजरा केला जातो. या दिवशी जालना शहर व संपुर्ण जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात लोक एकत्र येवून उत्साह साजरा करतात. नवीन वर्षाचे स्वागत म्हणुन विविध कार्यक्रम, नाचगाणे, डिजे वाजून डान्स करणे, फटाके फोडणे, रोषणाई करणे, हॉटेल व धाबे, शहरातील महत्वाच्या ठिकाणी पर्यटन स्थळे इत्यादी ठिकाणी लोकांचा जमाव एकत्र येवून विविध कार्यक्रम आयोजन करण्यात येते. सदर कार्यक्रम रात्री उशिरापर्यंत सुरु असतो. तसेच दि. ३१ डिसेंबर २०२४ रोजी वर्ष अखेर व दि. १ जानेवारी २०२५ जानेवारी जयस्तंभ भिमा कोरेगाव शौर्यदिन निमित्ताने मानवंदना देण्यासाठी नागरीक मोठ्या प्रमाणात पुणे येथील जयस्तंभ भिमा कोरेगाव येथे जातात. सदर सण उत्सवाचे अनुषंगाने जालना शहरात व जिल्ह्यात विविध कार्यक्रम आयोजित होतात.

तसेच मराठा आरक्षण, ओबीसी आरक्षण बचाव व धनगर समाज एस. टी. प्रवर्गात समाविष्ठ करावे या अनुषंगाने जालना जिल्ह्यात विविध प्रकारचे आंदोलन कार्यक्रम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे अनुचित प्रकार घडून कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो.

तसेच महाराष्ट्रात राजकीयदृष्ट्या सत्ताधारी व विरोधकात एकमेकांविरुध्द गटबाजी व आरोप प्रत्यारोप विविध कारणांवरुन सुरु आहेत. तसेच शेतकऱ्यांचे विविध मागण्यासाठी विविध संघटनाकडून आत्मदहन,उपोषण, धरणे मोर्चे, निर्दशने, रास्तारोको इत्यादी सर्व प्रकारची आंदोलनात्मक कार्यक्रम घेण्याची शक्यता नाकारतायेत नाही. त्यामुळे अपर जिल्हादंडाधिकारी जालना यांना प्राप्त अधिकारानुसार पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) अन्वये शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यांच्या व्यतिरिक्त इतर कोणतीही व्यक्ती सार्वजनिक ठिकाणी किंवा त्या आसपास शस्त्रे, लाठ्या, सोटे, बंदुके, तलवारी , भाले, चाकु व इतर शरीरास इजा अथवा अपाय करणा-या वस्तु जवळ बाळगणार नाही. तीक्ष्ण पदार्थ अथवा स्फोटके सहज हाताळता येतील अशी घातक वस्तु जवळ बाळगणार नाही. दगड किंवा इतर उपकरणे किंवा प्रवर्तक शस्त्रे गोळा करुन ठेवणार नाही किंवा जवळ बाळगणार नाही. व्यक्तींच्या किंवा समुहाच्या भावना जाणुनबुजुन दुखविण्याचे उद्देशाने असभ्यतेने भाषण म्हणणार नाही, वाद्य वाजविणार नाही, गाणे म्हणणार नाही. व्यक्तींचे किंवा शवाचे किंवा त्याच्या प्रतिकृतीचे प्रदर्शन करणार नाही. आवेषी भाषण, अंगविक्षेप,विडंबनापर नकला करणार नाही आणि सभ्यता किंवा नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा कोणतीही वस्तु बाळगणार नाही.तसेच अपर जिल्हादंडाधिकारी जालना यांना प्राप्त अधिकारानुसार पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (३) अन्वये पाच किंवा अधिक व्यक्तींना जमण्यास किंवा सभा, मिरवणुका, मोर्चा काढण्यास मनाई केली आहे.

पान ६ वरून...

पोलीस आणि महसूल

आरोपी आहेत यामध्ये लाचेची रक्कम दोन लाख तीस हजार रुपये एवढी आहे राज्य परिवहन महामंडळामध्ये एक गुन्हा दाखल असून यामध्ये एका आरोपीने ३० हजार रुपये लाचेची मागणी केल्याची यामध्ये नोंद आहे शिक्षण विभागामध्ये तीन गुन्हे दाखल असून यात सात आरोपी असून या सातारा उभी करून तीस हजार रुपये लाचेची रक्कम जप्त केली गेली आहे विद्युत महामंडळामध्ये दोन गुन्हे दाखल असून या तीन आरोपी वर गुन्हे दाखल केले आहेत यामध्ये ३१ हजार रुपये लाखेची रक्कम आहे सहकार विभागामध्ये केलेल्या कारवाईत एकूण तीन गुन्हे असून यात सहा रोकीवर गुन्हे दाखल करण्यात आले असून लाचेची रक्कम एक लाख पंचावन्न हजार रुपये एवढी आहे यासोबतच २०२४ मध्ये उघड चौकशी करून पोलीस उपाधीक्षक व त्यांच्या टीमने दोन अस संपदा गुन्हे दाखल करून त्यांच्याकडे प्रत्येकी तीन कोटी दोन लाख ६४ हजार संपदा निष्पन्न झाली आहे एसीबीने या वर्षभराचा कार्यकाळात छत्रपती संभाजी नगरचे पोलीस अधीक्षक संदीप पाटोळे प्रभारी अप्पर पोलीस अधीक्षक मुकुंदराव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपाधीक्षक बीड शंकर शिंदे गुलाब पाचेवाड पोलीस सहकारी श्री राम गिराम राजेश मेहरकर हनुमान गोरे सुदर्शन निकाळजे भरत गारदे स्नेहल कुमार कोरडे अमोल खरसाडे अविनाश गवळी संतोष राठोड गणेश मेहत्रे अंबादास पुरी यांनी ही कारवाई केली.

सततच्या 'बंद' ला दिंदूडकर

आहे. बारीक सारीक कारणावरून व देश विदेशात घडलेल्या काही घटनांमुळे बंद पुकारण्याची प्रथा रूढ होत आहे. पूर्वी असे बंद मोठमोठ्या शहरात पुकारले जायचे, मात्र आता याचे लोन ग्रामीण भागात पसरत आहे. वारंवार बंद घोषीत केले जात आहेत, त्यामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत होत आहे. यापुढे 'बंद' हा विषय कायमचा 'बंद' होणे गरजेचे असल्याची मागणी आता पुढे येत आहे.

तक्रार करताच प्रशिक्षकाचे

घटनेनेही तक्रार केलेली आहे. प्रशिक्षणाची चौकशी मु.का.अ.करतील काय? गेल्या अनेक दिवसापासून स्टुडन्ट रिलीफ सोसायटी जयपुर ने बीडमध्ये उच्छाद मांडला असून बोगस प्रशिक्षण घेऊन कोट्यावधी रूपयांची लूट चालू केली आहे. या प्रशिक्षणासाठी प्रवीण प्रशिक्षक नेमण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची आहे. मात्र त्यांना न विचारताच कोणीही यासाठी नेमून ते प्रवीण असो किंवा नसो अशा लोकांवर हे प्रशिक्षण चालू आहे. या सर्व प्रकरणाची चौकशी मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने हे करतील काय असा सवाल जनतेतून केला जात आहे.

गुणवत्ता तपासणीसाठी

भविष्यातील विविध स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी मार्गदर्शन केले. डोंगरपट्यातील सवासेवाडी सारख्या दुर्गम व ग्रामीण भागातील वस्तीवर अत्यंत हूशार व बुध्दिमान मुले शाळेत उत्तमरित्या शिक्षण घेत असल्याने त्यांना घडविण्याचे कार्य करत असलेले शिक्षक नागरगोजे बी.बी.सर व आरसेवार पी.एस.सर यांचे कौतुक करुन अभिनंदन केले. व मार्गदर्शन करणाऱ्या या शिक्षकांच्या पाटीवर शाबासकीची थाप दिली व समाधान व्यक्त केले.

समाज सेवेची समई सतत तेवत राहावी यासाठी श्री.क्षेत्र आळंदी येथे २६ डिसेंबरला संत पूजन कार्यक्रमाचे आयोजन

वडवणी । प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठा महासंघ व जगद्गुरु तुकाराम महाराज सामाजिक अध्यात्मिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने श्री क्षेत्र आळंदी येथे राज्यातील संत महंत ज्येष्ठ किर्तनकार संत साहित्याच्या अभ्यासक फडकरी वारकरी शिक्षण संस्थाद्वारा ज्ञानदान करणाऱ्या गुरुजनांचे संत पूजन तथा सेवा गौरव समारंभ दिनांक २६ १२ २०२४ रोजी वै.गोविंद महाराज केंद्रे संस्थापित श्री ज्ञानेश्वरी मंदिर दुपारी २ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत संपन्न होत असून संत पूजन माननीय श्री नामदार मुरलीधर मोहोळ अण्णा केंद्रीय राज्यमंत्री तर या सांस्कृतिक धार्मिक सोहळ्याचे उद्घाटन माजी केंद्रीय मंत्री श्री जयसिंगराव गायकवाड पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे व्यासपीठावर आशीर्वाद देण्यासाठी शांती ब्रह्म मारुती महाराज कुरेकर बाबा ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त योगी निरंजनाथ डॉक्टर भावार्थ देखणे श्री विठ्ठल रुक्मिणी समिती पंढरपूरचे ह भ प गहिनीनाथ औसेकर जगद्गुरु तुकाराम महाराज यांचे वंशज बापूसाहेब मोरे देहूकर ह भ प संजय मोरे देवकर अध्यक्ष फडकरी दिन दिंडी करी समाज संघटना महाराष्ट्र राज्य ज्ञानेश्वर माऊली जन्म संस्थान आपेगाव तालुका पैठणचे अध्यक्ष ह भ प ज्ञानेश्वर दादा कोल्हापूरकर मुक्ताई संस्थांचे ह भ प रवींद्र महाराज हरणे संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉक्टर नारायण जाधव भागवत महाराज जळगावकर स्वानंद सुख निवासी जोग महाराज वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ह भ प संदिपान महाराज हासेगावकर समारंभाचे स्वागत अध्यक्ष ह भ प चैतन्य महाराज कबीर अमृत आश्रम स्वामी नवगण राजुरी संत भूमी संरक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष ह भ प मधुसूदन पाटील ह भ प पुरुषोत्तम महाराज मोरे देहुकर अध्यक्ष श्री संत तुकाराम महाराज संस्थान देहू गुरुनाम गुरु बंकट स्वामी महाराज संस्थान पंढरपूर आळंदी नेकनुर चे मंत ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे मुकुंदराज संस्थांचे अध्यक्ष ह भ प किशन महाराज पवार आळंदी येथील वारकरी शिक्षण संस्थेचे सर्व अध्यापक शिष्यगण उपस्थित राहणार आहेत. या समारंभाचे प्रयोजन हेतू स्पष्ट करताना श्री शेंडगे पाटील यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे की अखिल भारतीय मराठा महासंघ ही सामाजिक संघटना राजश्री शाहू महाराज यांच्या आशीर्वादाने इसवी सन १९०० साली तत्कालीन समाज व्यवस्थेच्या विरुद्ध बहुजन समाजाला एकत्र करून समाज ज्ञानी बनविणे अज्ञान दूर करून सशक्त समाज करणे भारताच्या स्वातंत्र्यासाठी जनजागृती करणे यासाठी स्थापन झाली या संस्थेचे जुने नाव क्षेत्रीय मराठा न्याती समाज या नावाने तत्कालीन सामाजिक पुढारी देशभर सभा संमेलन घेऊन शिक्षणाचा पुरस्कार करीत असत बहुजन समाजाने शिकावे सुसंस्कृत व्हावे हीच भावना तत्कालीन नेत्यांमध्ये होती स्वातंत्र्य लढ्यात भाग घेण्यापासून ते संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीपर्यंत अनेक आंदोलनात क्षत्रिय मराठा न्याती समाजाचे नेते होते १९७८ साली क्षत्रिय मराठा समाजाचे भव्य अधिवेशन मुंबई येथे पार पडले होते या

अधिवेशनाला देश विदेशातून समाजबांधव हजर होते याच अधिवेशनात आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या सर्व समाजाला सवलती द्या अशी मागणी करण्यात आली १९८१ मध्ये क्षत्रिय मराठा न्याती समाजाचे नाव बदलून अखिल भारतीय मराठा महासंघ करण्यात आले आणि माथाडी कामगार नेते स्वर्गीय आमदार अण्णासाहेब पाटील यांच्या नेतृत्वाखाली आरक्षणाच्या मागणीने पुन्हा रान पेटले स्वर्गीय अण्णा साहेबांच्या अचानक जाण्याने समाज पोरका झाला अशा बिकटप्रसंगी स्वर्गीय शशिकांत उर्फ आप्पासाहेब पवार यांनी महासंघाची धुरा सांभाळली सतत ५० वर्ष आरक्षणाची लढाई लढता लढता दिनांक ७ फेब्रुवारी २०२३ रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला अँड शशिकांत उर्फ आप्पासाहेब यांच्या अध्यक्ष कार्यकाळात महाराष्ट्रातून अनेक जिल्ह्यातून त्यांना समर्थ साथ दिली यामध्ये कै.प्रभाकर शिंदे ,कै.किशनराव वरखिंडे ,कै. सुरेश माने, कै. क्षत्रिय महासभेचे प्रेम पाल सिंह मराठवाड्यातून परळीचे स्वर्गीय स्वर्गीय रावसाहेब काळे स्वर्गीय बाबासाहेब राऊत,

स्वर्गीय बाबासाहेब पिंगळे, विदर्भ वीर अण्णासाहेब पाटील येरळीकर, स्वर्गीय नागोराव लोमटे, स्वर्गीय प्रताप माणिकराव मस्के, मा श्री आमदार भाई जगताप कामगार नेते, मा श्री दिलीप दादा जगताप विद्यमान अध्यक्ष, मा श्री संतोष नानवटे, पुण्यातून स्वर्गीय प्रभाकर दुर्गे, परभणी येथून ह भ प बालासाहेब मोहिते, विदर्भातून राजेंद्र कडू, ह भ प रवींद्र महाराज हरणे, अशोक हिंगे, बब्रुवान जगन्नाथ शेंडगे पाटील, रमेश पोकळे ,सुहास पाटील, सुरेश फावडे, सुबराव सोळंके, दादासाहेब शिंदे पाटील, संतोष डावकर, ज्ञात अज्ञात कार्यकर्त्यांनी भगव्या ध्वजाचे पाईक म्हणून आप्पासाहेबांबरोबर लढत राहिले यामध्ये स्वर्गीय विनायकराव मेटे यांनी सुद्धा मराठा महासंघासाठी कार्य करून नंतर शिवसंग्राम नावाची वेगळी संस्था निर्माण करून ते मराठा महासंघाच्या बाहेर पडले मा श्री शशिकांत उर्फ आप्पा साहेब यांच्या नेतृत्वाखाली दिनांक २४ व २५ डिसेंबर २००० या साली मराठा महासंघाचा शतक महोत्सव कार्यक्रम शिवाजी पार्क मुंबई येथे गगनगिरी महाराजांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आला याप्रसंगी अनेक संत मंडळी उपस्थित होते

आतापर्यंत महासंघाने अनेक चढउतार पाहिले अनेक संघर्षातून जावे लागले परंतु साधुसंत महात्मे यांच्या आशीर्वादाने १२५ वे वर्ष साजरी करण्याचे भाग्य आम्हास लाभले ४८ वर्षानंतर अँड शशिकांत उर्फ आप्पासाहेब यांच्यानंतर माननीय श्री दिलीप दादा जगताप यांना अध्यक्षपदाचा मान प्राप्त झाला त्यांच्याच नेतृत्वाखाली मराठा महासंघ पुढील शंभर वर्ष समाजसेवेत कार्यरत राहावा यासाठी श्रीक्षेत्र आळंदी येथे संत पूजन तथा सेवा गौरव समारंभ संपूर्ण होत आहे जेणेकरून समाजसेवेची समय सतत तेवत राहावी यासाठी ह भ प साधू संत महंत समाजसेवक यांचे आशीर्वाद लावावे हीच अपेक्षा अखिल भारतीय मराठा महासंघ शतकोत्तर रोप्य महोत्सवी वर्षानिमित्त अंड शशिकांत पवार यांच्या स्मरणार्थ मराठा भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे विद्यमान अध्यक्ष माननीय श्री दिलीप दादा जगताप यांना समर्थ साथ देण्यासाठी गुलाबराव गावंडे राष्ट्रीय कार्याध्यक्ष संतोष नानवटे राष्ट्रीय उपाध्यक्ष,संभाजी दहातोंडे राष्ट्रीय सरचिटणीस,श्रीरंग बरंगे राष्ट्रीय कोषाध्यक्ष,दसरत पिसाळ राष्ट्रीय चिटणीस दिलीप धंदरे राष्ट्रीय संपर्कप्रमुख,जगद्गुरु तुकाराम महाराज प्रतिष्ठानचे अध्यक्ष बब्रुवान शेंडगे पाटील हे सर्वजण आपापल्या विभागात झंजावती दौरा करून संत महंत समाजसेवक यांनी कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी सतर्क असून मराठवाड्यातही या कार्यक्रमाची लगबग उत्साह दिसून येत आहे परभणीचे विभागीय अध्यक्ष धाराजी भुसारे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण मोहिते बीड जिल्ह्याचे अध्यक्ष गणेश नाईकवाडेकार्यरत असून या समारंभास संगीत क्षेत्रातील माननीय श्री रघुनाथ खंडाळकर गुरुजी संगीता अलंकार सोळुंके गुरुजी कल्याण गायकवाड गुरुजी उद्धव बापू शिंदे गायत्री गायकवाड यांची उपस्थिती लाभणार आहे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मा श्री डी डी भोसले नगरसेवक संत ज्ञानेश्वर माऊली विद्यालयाचे मा श्री अजित वडगावकर माजी नगर उपाध्यक्ष ,आनंद कुमार कुराडे पाटील अध्यात्मिक राज्य आघाडी प्रमुख संजय घुंडरे पाटील अथक परिश्रम घेत असून या सोहळ्याचे सुरेख सूत्रसंचालन प.पु संतोषानंदजी शास्त्री श्रीमद्? भागवत कथा एवं राम कथेचे सरस प्रवक्ता हे करणार आहेत.

कांद्यावरील निर्यात शुल्क हटवा !

महाविकास आघाडीच्या खासदारांचं उपोषण, मंत्री पियूष गोयलांना दिले पत्र

दिल्ली : सध्या राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत. कारण दिवसेंदिवस कांद्याचा दर कमी होताना दिसत आहे. याचा मोठा आर्थिक फटका कांदा उत्पादक शेतकऱ्यांना बसत आहे. दरम्यान, कांद्याच्या निर्यातीवर लावण्यात आलेले २० टक्के निर्यात शुल्क हटवावे अशी मागणी केली जात आहे. याच मुद्यावरुन शेतकऱ्यांसह विरोधक आक्रमक झाले आहेत. दरम्यान, आज महाविकास आघाडीच्या खासदारांनी दिल्लीत वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांची भेट घेऊन त्यांना याबाबतचे पत्र दिले आले. लवकरात लवकर कांद्यावरील निर्यात शुल्क हटवावे अशी मागणी त्यांनी केली आहे.

कांद्यावरील निर्यात शुल्क केंद्र सरकारने २० टक्क्यांनी वाढवल्यामुळं कांदा निर्यात पूर्णपणे ठप्प झाली आहे. कांद्याच्या किंमती घसरल्या आहेत. त्यामुळं शेतकऱ्यांचं मोठं आर्थिक नुकसान होत असल्याची माहिती खासदारांनी दिली आहे. कांद्यावरील निर्यात शुल्क हे शासनाने पूर्णपणे काढले पाहिजे यासाठी महाविकास आघाडीच्या खासदारांनी वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांची भेट घेतली. तसेच लोकसभेच्या मकरद्वारावर उपोषण देखील करण्यात आलं. यावेळी बारामतीच्या खासदार

सुप्रिया सुळे, अहमदनगरचे खासदार निलेश लंके, बीडचे खासदार बजरंग सोनावणे, नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे उपस्थित होते. देशातील एकूण कांदा उत्पादनाच्या ६० टक्के कांदा उत्पादन हे एकट्या महाराष्ट्रात होते. तर राज्याच्या एकूण कांदा उत्पादनापैकी ६० टक्के कांदा हा एकट्या नाशिक जिल्ह्यात पिकतो. कांदा हे ऐकमेव नगदी आणि जिव्हाळ्याचे पीक आहे. त्यामुळं सरकारनं कांदा निर्यातीस प्रोत्साहन देणं गरजेचं आहे. लासलगाव ही अशिया खंडातील सर्वात मोठी कांद्याची बाजारपेठ आहे. या ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात इतर देशात कांद्याची निर्यात केली जाते. सध्या उन्हाळ कांद्याचे उत्पादन संपल्यामुळं लाल कांदा बाजारात येत आहे. मात्र, कांद्याच्या दरात मोठी घसरण झाल्यानं शेतकरी अडचणीत आले आहेत. अत्यंत कमी दरानं बाजारात कांद्याची विक्री सुरु आहे. सध्या कांद्याला २००० रुपयांच्या आसपास दर मिळत आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी कांद्याला ४००० ते ५००० रुपयांचा दर मिळत होता. मात्र, अचानक दरात मोठी घसरण झाली आहे. आधीच कांदा उत्पादक शेतकऱ्यांना नैसर्गिक संकटांचा मोठा फटका बसला आहे. अशातच आता उत्पादन खर्चापेक्षाही दर कमी मिळत आहे. त्यामुळं शेतकऱ्यांना मोठा आर्थिक तोट सहन करावा लागत आहे. राज्यातील कांद्याला परदेशात मोठी मागणी आहे. मात्र, सरकारनं कांद्याच्या निर्यातीवर २० टक्के शुल्क लावले आहे. त्यामुळं त्याचा परिणाम थेट कांद्याच्या निर्यातीवर होत आहे.

बांबू क्षेत्रातील योगदानाबद्दल पाशा पटेल यांचा सत्कार

नवी दिल्ली : 'नेट झीरो साध्य करण्यासाठी न्याय्य संक्रमण-सार्क क्षेत्रामध्ये बांबूची भूमिका' या विषयावर देव्हेंचर सारोवर पोर्टिको, नवी दिल्ली येथे आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. फाउंडेशन फॉर एमएसएमई क्लस्टर्स (एफएमसी) तसेच सार्क डेव्हलपमेंट फंड (एसडीएफ) यांच्या सहकार्याने या परिषदेत बांबूच्या साह्याने शाश्वत विकास व नेट झीरो भविष्यात कसे योगदान देता येईल यावर चर्चा करण्यात आली.

या परिषदेत राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांना भारतातील बांबू क्षेत्राच्या विकासासाठी दिलेल्या योगदानाबद्दल सन्मानित करण्यात आले. त्यांचा सन्मान फाउंडेशन फॉर एमएसएमई क्लस्टर्सचे अध्यक्ष अजय शंकर यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी सोशल विंडो, सार्क डेव्हलपमेंट फंडाच्या सहाय्यक संचालक रिन्झी पेम, आणि एफएमसीचे कार्यकारी अध्यक्ष मुकेश गुलाटी उपस्थित होते. ही परिषद 'सार्क देशांमध्ये एकात्मिक बांबू-आधारित उद्योजकता विकासाला चालना देणे' या प्रकल्पाचा महत्त्वपूर्ण टप्पा ठरली. हा प्रकल्प २०१७ पासून अफगाणिस्तान, बांगलादेश, भूतान, भारत आणि नेपाळ येथे राबवला जात आहे.सार्क डेव्हलपमेंट फंडच्या सहकार्याने हा प्रकल्प शाश्वत आर्थिक प्रगती आणि पर्यावरण संरक्षण यासाठी बांबूचा उपयोग करण्यावर भर देण्यात येत आहे. या परिषदेमुळे सार्क देशांनी सामाजिक व आर्थिक विकासासाठी बांबू क्षेत्राचा विकास करण्याची सामूहिक वचनबद्धता पुन्हा अधोरेखित झाली. हवामान बदलावर मात करण्यासाठी, ग्रामीण उपजीविकेस चालना देण्यासाठी आणि शाश्वत व हिरव्या अर्थव्यवस्थेच्या दिशेने प्रयत्न करण्यासाठी बांबूच्या प्रचंड संभाव्यतेवर भर देण्यात आला.

हिवाळ्यात शेळ्या-मेंढ्यात होणारे आजार व घ्यावयाची काळजी

हिवाळ्यामध्ये शेळ्या-मेंढ्यांना प्रामुख्याने आंत्र विषरक्तता, संसर्गजन्य न्यूमोनिया, मवा फुट रॉट, सांसर्गिक गर्भपात, बाह्यकृमी, करडांची हगवण, इन्फेक्शस केरॅटायटीस (पिंक आय) असे विविध प्रकारचे आजार होतात.

आंत्र विषरक्तता या रोगास एन्ट्रोटॉक्सीमिया व काही ठिकाणी भूल देखील म्हणतात. हा आजार विषाणूमुळे होतो. अचानक खाण्यात होणाऱ्या बदलामुळे किंवा तणावामुळे हा रोग उद्भवतो. लक्षणे-शेळीचे पोट दुखते यामुळे शेळी वारंवार उट-बस करते. क्वचितप्रसंगी जमिनीवर कोलांट्यादेखील मारते. पोटावर लाथ झाडते. पाटीचा कणा धनुष्याकृती होतो व कधी कधी हगवण देखील सुरू होते. या आजाराची रोगबाधा ही प्रमुख तीन ठळक स्वरूपात आळळून येते.

१) अतितीव्र स्वरूप : सामान्यतः करडात आढळून येते. रोगाचा कालावधी हा २४ तासापेक्षा देखील कमी असतो आणि पुष्कळदा लक्षात देखील येत नाही व ते दगावते. २) तीव्र स्वरूप : सामान्यतः लक्षणे ही सारख्याच स्वरूपाची आढळतात, परंतू तिव्रता कमी असते. रोगाचा कालावधी हा ३ ते ४ दिवसांचा असतो. उपचाराअभावी काही जनावरे मरण पावतात. रोगबाधा साधारणतः प्रौढ जनावरांत आढळून येते. रोगबाधेचा प्रादुर्भाव लसीकरण झालेल्या शेळ्या-मेंढ्यांच्या कळपातदेखील आढळून येतो.

३) दिर्घकालीन बाधा वारंवार कळपातील शेळ्या-मेंढ्या आजारी पडताना आढळतात. साधारणतः प्रौढ शेळ्या बळी पडतात. आजारी शेळ्या मलून मरणासन्न दिसतात. हगवण वारंवार होत असल्याने शेळ्या-मेंढ्यांच्या वजनात घट होते. हा आजार टाळण्यासाठी पुढीलप्रमाणे रोगप्रतिबंधक उपाय व काळजी घेतली पाहिजे. करडू ४ ते ६ आठवड्याचे झाल्यावर लसीची पहिली मात्रा टोचून घ्यावी. बुस्टर लस १५ दिवसांनी लावावी व त्यानंतर ६ महिन्यांनी लसीकरण आवश्य करून घ्यावे. कळपात रोगबाधेची नोंद झाली असल्यास लसीकरण दर ४ महिन्यांनी करून घ्यावे.

फार्मवर नवीन शेळ्या आढळल्यास त्यांना विनाविलंब लसीकरण करून घ्यावे. त्यानंतरच शेळ्या कळपात सोडाव्यात.

शक्यतो लसीकरण कार्यक्रम असा आयाजित करावा की शेळ्या-मेंढ्या विण्यापूर्वी २ ते ३ आठवडे लस टोचणीची वेळ राहील, जेणेकरून नवजात पिल्ल्यांना आईकडून रोगप्रतिकारशक्ती प्राप्त होईल. शेळ्या-मेंढ्यात होणारा दुसरा महत्वाचा आजार म्हणजे मवा होय. हा एक विषाणूमुळे होणारा सांसर्गिक रोग आहे. रोगाचा प्रसार शेळ्या-मेंढ्यांच्या कळपात अतिशय झपाट्याने होत असतो. रोगप्रसारात पिडीत जनावरांचा संपर्क अथवा प्रक्षेत्रावरील अवजारे मदत करतात. या रोगाची विशिष्ट लक्षणे म्हणजे शेळ्या-मेंढ्यांच्या त्वचेवर पिटिका आणि पुटिका आढळतात. क्वचितप्रसंगी नाकपुड्या व डोळ्यात देखील दिसतात. त्यानंतर याचे रूपांतर पुटिकांत होते व त्यावर जाड खपली धरली जाते. आजारी कोकरांना दूध ओढता येत नाही व चारा देखील खाता येत नाही. खाता न आल्याने अशी कोकरे व शेळ्या-मेंढ्या झपाट्याने कमजोर होतात व वजनात घट होते. हा आजार झाल्यास लागण झालेल्या शेळ्या-मेंढ्या तात्काळ कळपातून वेगळ्या कराव्यात व इतर आजारी जनावरांचा उपचार सुरू करावा, जेणेकरून कळपातील इतर निरोगी शेळ्या-मेंढ्यांना या रोगाची लागण होणार नाही.

संसर्गजन्य न्यूमोनिया : रोगाचा प्रादुर्भाव कोणत्याही ऋतूत आढळत असला तरी हवामान थंड झाल्यावर रोगाचे प्रमाण वाढलेले आढळते.

सांसर्गिक गर्भपात कमी करण्याकरीता शेळ्या-मेंढ्यांच्या कळपासाठी पुरेशी जागा असायला हवी. कळपाचे विभाजन करून ठेवल्यास हिवाळ्यामध्ये हे आजार कमी प्रमाणात पसरतात. शक्यतो दुषित खाद्य, पाणी आणि चारा शेळ्या-मेंढ्यांना देणे टाळावे.इन्फेक्शस केरॅटायटीस (पिंक आय) यालाच डोळे येणे असेही म्हणतात. जिवाणूमुळे हा आजार होतो. रोगाचा पूर्वकाळ सामान्यतः २ ते ३ दिवसांचा असतो. डोळे लाल होणे, डोळ्यातून पाणी वाहणे, उन्हात डोळ्यांना त्रास होतो म्हणून जनावरे डोळे बंद ठेवतात. शारीरिक तापमानात सौम्य प्रमाणात वाढ होते. एक ते दोन दिवसात डोळ्याच्या मध्यभागी पांढरा पडदा दिसू लागतो. डोळ्याचा पांढरापणा वाढत जाऊन एक किंवा दोनही डोळे पांढरे होतात. काहीवेळा डोळा फुटून जातो व अंधत्व येते. परंतू २ ते ३ आठवड्यात दृष्टी पूर्ववत होते. आजार कमी करण्यासाठी लागण झालेल्या शेळ्या-मेंढ्यांना तात्काळ वेगळे करावे व पुशुवैद्यकांच्या साहाय्याने उपचार सुरू करावेत.

दिन विशेष

जागतिक दिवस:
जागतिक वनदिन;जागतिक वन्य दिन
विश्व वंशभेद निर्मूलन दिवस;पृथ्वी दिन

महत्वाच्या घटना

- १५५६ : ख्रिश्चन धर्मात सुधारणांची आवश्यकता आहे असे सांगणार्या आर्चबिशप थॉमस क्रॅनमर यांना शिक्षा म्हणून जिवंत जाळण्यात आले.
- १६८० : छत्रपती शिवाजी महाराजांनी रायगड जिल्ह्यातील कुलाबा किल्ल्याची बांधणी सुरु केली.
- १८३६ : कोलकाता येथील राष्ट्रीय लायब्ररी(वाचनालय) नावाने प्रसिद्ध असलेल्या सार्वजनिक पुस्तकालयाची स्थापना करण्यात आली.
- १८५८ : साली इंग्रज सेनापती सर ह्यू रोझ यांनी झाशीच्या राणी लक्ष्मीबाई राहत असलेल्या किल्ल्याला वेढा दिला होता.
- १८७१ : ऑटो व्हॉन बिस्मार्क हे जर्मनीचा चॅन्सेलर बनला.
- १८८७ : मुंबईमध्ये प्रार्थना समाजाची स्थापना करण्यात आली.
- १९३५ : शाह रझा पेहलवी यांनी पर्शियाचे नाव ईराण करावे असे आवाहन केले.
- १९७५ : सर्वप्रथम राष्ट्रपती फखरुद्दीन अली अहमद यांनी इंदिरा गांधी यांच्या विनंतीवरून कलम ३५२ अंतर्गत मध्यरात्री आणीबाणी जाहीर केली होती. सन १९७७ साली भारतातील आणीबाणी संपुष्टात आली.
- १९७७ : भारतातील आणीबाणी संपुष्टात आली.
- १९८० : अमेरिकेने मॉस्को ऑलिम्पिक खेळांवर बहिष्कार टाकला.
- १९९० : नामिबियाला दक्षिण अफ्रिकेपासून स्वातंत्र्य मिळाले.
- १९९२ : भारताची 'शंकूल' ही दुसरी पाणबुडी नौदलात सामील झाली
- २००० : फ्रेंच गयानातील कोअरु येथून एरियन ५०५ या वाहकाद्वारे भारताचा इन्सॅट ३ बी हा उपग्रह यशस्वीपणे प्रक्षेपित करण्यात आला.
- २००३ : जळगाव महानगरपालीकेची स्थापना.
- २००६ : सोशल मीडिया साइट ट्विटर ची स्थापना झाली.
- २०१२ : आंतरराष्ट्रीय वन दिन

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

- १७६८ : फ्रेन्च गणितज्ञ व भौतिकशास्त्रज्ञ जोसेफ फोरियर यांचा जन्म. (मृत्यू: १६ मे १८३०)
- १८४७ : कालजंत्रीकार बाळाजी प्रभाकर मोडक यांचा जन्म. (मृत्यू: २ डिसेंबर १९०६)
- १८८७ : देशभक्त, क्रांतिकारक व भारतातील कम्यूनिस्ट पक्षाचे संस्थापक मानवेंद्रनाथ रॉय यांचा जन्म. (मृत्यू: २६ जानेवारी १९५४)
- १९१२ : चित्रपट निर्माता, लेखक, दिग्दर्शक आणि प्रसिद्ध संगीतकार ख्वाजा खुर्शीद अनवर यांचा जन्मदिन.
- १९१६ : बिस्मिल्ला खाँ, भारतीय सनईवादक.
- १९२२ : बांगलादेशचे प्रथम प्रधानमंत्री 'मुजिबुर रहमान' यांचा जन्मदिन.
- १९२३ : सहज योग च्या संस्थापिका आणि अध्यात्म गुरु निर्मला श्रीवास्तव यांचा जन्म. (मृत्यू: २३ फेब्रुवारी २०११)
- १९३७ : भारतीय हॉकी खेळाडू मोहम्मद जाफर यांचा जन्मदिन.
- १९४४ : केरळ राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री पिनाराय विजयन यांचा जन्मदिन.
- १९७८ : अभिनेत्री राणी मुखर्जी यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

- १८२७ : मध्य भारतातील ग्वाल्हेर राज्याचे राजा श्रीमंत दौलतराव शिंदे यांचे निधन.
- १९५२ : शिक्षणतज्ज्ञ आणि हिंदी लेखक व साहित्यिक केशव प्रसाद मिश्र यांचे निधन.
- १९७३ : कोशकार यशवंत रामकृष्ण दाते यांचे निधन. (जन्म: १७ एप्रिल १८९१)
- १९७३ : आतुन कीर्तन वरुन तमाशा या नाटकाचा प्रयोग करत असतानाच नटवर्य शंकर घाणेकर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.
- १९८५ : ब्रिटिश अभिनेता सर मायकेल रेडग्रेव्ह यांचे निधन. (जन्म: २० मार्च १९०८)
- २००१ : दक्षिण कोरियन कंपनी ह्युंदाई चे स्थापक चुंग जू-युंग यांचे निधन. (जन्म: २५ नोव्हेंबर १९१५)
- २००३ : भारतीय लेखक शिवानी यांचे निधन. (जन्म: १७ ऑक्टोबर १९२३)
- २००५ : चित्रपट दिग्दर्शक, पटकथा व संवाद लेखक दिनकर द. पाटील यांचे निधन. (जन्म: ६ नोव्हेंबर १९१५)
- २०१० : अर्थशास्त्रज्ञ व विनोदी लेखक पांडुरंग लक्ष्मण तथा बाळ गाडगीळ यांचे निधन. (जन्म: २९ मार्च १९२६)

वर्षातून चार वेळा उत्पन्न देणारी पीसीयूएच काकडी

महाराष्ट्रात वेगवेगळ्या प्रकारच्या काकडीच्या जाती आहेत. पण पीसीयूएच काकडी हिची लागवड वर्षातून चार वेळा करता येते. यामधून मोठे उत्पादन आणि उत्पन्न शेतकऱ्यांना मिळत आहे.

पीसीयूएच काकडीची वैशिष्ट्ये : या जातीची काकडी वर्षभर लागवडीसाठी उत्तम पर्याय असून या काकडीपासून उत्पन्न सुद्धा चांगले मिळते. पेरणीनंतर काही दिवसांत ही जात काढणीला तयार होते, तसेच या जातीच्या काकडीचा लागवड खर्चही कमी आहे. काकडीच्या या जातीचे बियाणे बाजारात शेतकर्यांना सहज उपलब्ध आहे. या काकडीच्या लागवडीसाठी योग्य प्रमाणात पाणी लागते. तणमुक्त शेतात आणि ठिबक सिंचन तंत्राचा वापर करून काकडीचे चांगले उत्पादन घेता येते.

पीसीयूएच काकडीची लागवड पद्धती : ही काकडी वालुकामय जमिनीत चांगले उत्पादन देते. या काकडीच्या लागवडीसाठी जमिनीचा सामू ६ ते ७ च्या दरम्यान असावा. या जातीच्या लागवडीसाठी थोडे गरम तापमान आवश्यक आहे. काकडीच्या चांगल्या उत्पादनासाठी शेताची दोन ते तीन वेळा नांगरणी करून जमीन समतल करावी. या काकडीच्या लागवडीसाठी शक्यतो फक्त सेंद्रिय खताचा वापर करावा आणि बियाणे शेतात पेरणीपूर्वी पिकाचे कीड व रोगांपासून संरक्षण करण्यासाठी सेंद्रिय औषधे फवारावीत. काकडीच्या पिकाला जास्त ओलावा लागतो. उन्हाळ्यात पिकाला दर आठवड्याला सिंचनाची गरज असते. अशावेळी आधुनिक सिंचन पद्धतीचा वापर करून कमी पाण्यात उत्पादन घेण्याचा प्रयत्न करावा. पावसाळ्यात सिंचनाशिवाय चांगले उत्पादन घेता येते. काकडीच्या शेतातील तण किंवा अनावश्यक गवत काढण्यासाठी उन्हाळ्यात पिकात २० ते २५ दिवस ३ ते ४ वेळा खुरपणी करावी. दुसरीकडे पावसाळ्यात जास्त प्रमाणात तण उगवण्याची शक्यता असते अशा वेळी वारंवार तण काढत राहावे. सामान्य काकडींपेक्षा या जातीच्या काकडीचे उत्पादन जास्त येते. या जातीची लागवड करून तुम्ही एका वर्षात २ ते ३ लाख सहज कमवू शकता.

गौण खनिज विभागातील कर्मचाऱ्याने पत्रकारांना धमकावणे म्हणजे चोराच्या उलट्या बोंबा

बीड। प्रतिनिधी

दैनिक वास्तव बीडचे संपादक जितेंद्र सिरसाट यांनी दि.१९ डिसेंबर २०२४ रोजी '' बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयाची बोली लावाच! '' या मथळ्याखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील गौण खनिज अनुषंगाने होणारी आर्थिक लुट अनुषंगाने बातमी केल्याने संपादक जितेंद्र सिरसाट यांना जिल्हाधिकारी कार्यालयातुन महिला कर्मचाऱ्यांने फोनवरून वापरलेली एकेरी भाषा व उचलून आणण्यात येईल अशी गर्भित धमकी वजा दमदाटी केल्यामुळे एकंदरीत लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असलेल्या पत्रकारीतेवर हा हल्ला असुन यांच्या निषेधार्थ आणि संबंधित प्रकरणात सखोल चौकशी करून कारवाई करण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर व बीड तालुकाध्यक्ष शिवशर्मा शेलार, ऑल इंडिया पँथर सेना बीड

जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांनी अपर पोलीस अधीक्षक बीड सचिन पांडकर आणि जिल्हाधिकारी बीड यांना केली आहे.

बीड जिल्ह्यातील गौण खनिज तस्करी प्रकरणात यापूर्वीही '' जिल्हाधिकारी हटवा आणि बालाघाटाच्या हिरव्या डोंगर रांगा वाचवा'' ''जिल्हाधिकारी यांच्या आदेशाला केराची टोपली '' आदि लक्ष्यवेधी आंदोलने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करण्यात आलेली आहेत परंतु ठोस कारवाई करण्यात आलीच नाही. बीड जिल्ह्यातील गौण खनिज तस्करी प्रकरणात गौण खनिज विभागाचे अधिकारी कारवाई करण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ करत कार्यालयातील गौण खनिज अधिकारी आणि कर्मचारी यांना गौण खनिज तस्करी बाबत निवेदन तसेच आंदोलनानंतर सुद्धा कारवाई करण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ करत असतात. चौकशीच्या नावाखाली प्रकरणे प्रलंबित ठेवतात. संबंधित प्रकरणात विविध दैनिकात बातम्या प्रसिद्ध होतात.

शासनाचा महसूल बुडतो तसेच बीड तालुक्यातील बालाघाटाच्या कुशीतील हिरव्या डोंगर रांगा गौण खनिज तस्करीमुळे नामशेष होत आहेत.बीड जिल्ह्यातील खडी क्रशर अवैध रित्या चालतात.जिल्हाधिकारी यांनी खडीक्रशरची वीजपुरवठा तोडण्याचे आदेश देऊनही वीज पुरवठा खंडित केला जात नाही.याकडे गौण खनिज अधिकारी कठोर कारवाई करण्याचे टाळतात. याप्रकरणी आम्ही यापूर्वीही सतत निवेदने आणि आंदोलने केली आहेत परंतु अद्याप ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. तेव्हा गौण खनिज विभाग कुंभकर्णी झोपेत असतो का?? असा संतप्त सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी केला आहे.

देव दगडात नसून तो मानसात आहे-शर्वरी यादव

माजलगाव। प्रतिनिधी

श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयात संत गाडगेबाबा पुण्यतिथि संपन्न.कार्यक्रमाची सुरुवात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर व संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमा पूजनाने झाली.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना मुख्याध्यापक संतोष लिंबकर म्हणाले.संत गाडगे बाबांच्या तत्त्वाचे अनुकरण केले तर शासनाला स्वच्छता अभियान राबविण्याची गरज नाही.संत गाडगे बाबांचा वैज्ञानिक दृष्टिकोन होता.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना कु शर्वरी हरीश यादव म्हणाली की, संत गाडगे बाबांचे उपदेशही साधे, सोपे असत. चोरी करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, देवा-धर्माच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करू नका, जातिभेद व अस्पृश्यता पाळू नका असे ते आपल्या कीर्तनातून सांगत. देव दगडात नसून तो माणसांत आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला. अध्यक्षीय समारोपात वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटण करताना सिध्देश्वर माध्यमिक विद्यालय अध्यक्ष प्रशांत भानप म्हणाले त्या काळी शिक्षण नसल्यामुळे,समाज हा बहिर्मुख वृत्तिचा होता म्हणून संत गाडगे बांबांनी स्वच्छतेचा संदेश दिला.तो विद्यार्थ्यांनी स्वीकारावा आपली शाळा स्वच्छ ठेवावी.खीचडी खाताना जमीनीवर सांडू नये.व शालेय जीवनातील आनंद.आपल्या व्यक्तिगत सुप्त गुणांचा विकास या वार्षिक स्नेहसंमेलनात होतो.म्हणून सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा. स्नेहसंमेलन सहप्रमुख शिरीष देशमुख यांनी आभार मानले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अभ्यासपूरक मंडळ प्रमुख अपर्णा मुळेंनी केले. याप्रसंगी व्यासपीठावर प्रशांत भानप,मुख्याध्यापक संतोष लिंबकर, उपमुख्याध्यापक शैलेश कंगळे,विभाग प्रमुख रवींद्र खोडवे, पर्यवेक्षक सदाशिव ढगे,यांची उपस्थिती होती. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षिका,विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

पत्रकारांना धमकी देणाऱ्या आघाव यांच्यावर कार्यवाही करा

माजलगाव पत्रकाराच्यावतीने मागणी

माजलगाव। प्रतिनिधी

संपादक जितेंद्र सिरसट यांनी जिल्हाधिकारी गौण खनिज विभागातील गैरप्रकारा बाबत बातमी प्रकाशित केली होती.हीच बातमी जिल्हाधिकारी कार्यालयातील गौण खनिज विभागातील महिला कर्मचारी यांना खूप झोंबली आणि या महिला कर्मचाऱ्यांनी संपादक यांना धमकी देत एकेरी शब्द वापरले असल्याने याचा माजलगाव पत्रकारांच्या वतीने दि २० डिसेंबर शुक्रवार रोजी निषेध नोंदवत तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

संपादक जितेंद्र सिरसाट यांना जिल्हाधिकारी कार्यालयातील महिला कर्मचाऱ्याकडून एकेरी भाषा वापरत त्यांना धमकवण्यात आले,याचा तीव्र निषेध करत माजलगाव तालुक्यातील पत्रकार संघाच्या वतीने माजलगाव तहसीलदार यांना निवेदन देण्यात आलेल्या निवेदनात असे नमूद केले आहे की, जिल्हाधिकारी कार्यालयातील गौण खनिज विभागातील गैरप्रकारा बाबत संपादक जितेंद्र सिरसाट यांनी वास्तवतेची बातमी प्रसिद्ध करून जिल्हाधिकारी कार्यालयातील गौण खनिज विभागातील महिला अधिकारी श्रीमती आघाव यांना चांगलीच लागली असल्याने त्यांनी आपले भ्रष्टाचाराचे बिंग उघडे पाडल्याने आता आपली काहीच खैर नाही म्हणून संतापलेल्या या महिला अधिकाऱ्याने संपादक जितेंद्र सिरसट यांना सदरील महिला कर्मचारी यांना १९ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी ४:०० वाजण्याच्या सुमारास जितेंद्र सिरसाट यांना भ्रमनध्वनीद्वारे मो. ८९७५०१८००० या क्रमांकावरून फोन केला पदाची गरिमा न ठेवत त्या म्हणाल्या कि तू आताची आता सांयकाळी ६:०० वाजेपर्यंत बीड जिल्हाधिकारी कार्यालयात ये नाही आला तर तुला उचलून आणण्याचा पर्याय आमच्याकडे आहे तू किती नीच आहेस अशी असभ्य भाषा वापरली.त्यामुळे या धमकीचे पडसाद संपूर्ण जिल्हात उमटले आहेत. पत्रकाराकडून या विषयी संताप व्यक्त केला जात आहे तरी संबंधित महिला कर्मचाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी माजलगाव तालुक्यातील पत्रकाराच्या वतीने केली जात आहे. अशा आशयाचे निवेदन माजलगाव पत्रकारांच्या वतीने माजलगाव तहसीलदार व शहर पोलीस ठाणे माजलगाव यांना देण्यात आले आहे. यावेळी उमेश मोगरेकर,तुकाराम येवले, मेश जेथलिया,वैजनाथ घायतिडक,कमलेश जाब्रस, हरीश यादव,सुभाष नाकलगावकर, महिंद्र मस्के,ज्योतीराम पांढरपोटे,दिनकर शिंदे,किसन भदर्गे, परमेश्वर सोळंके, पृथ्वीराज निर्मळ, बाळासाहेब आडागळे, विष्णू उगले, वाजेद पठाण, हमीद शेख, रवी उघडे,अमर साळवे, सुहास बोराडे, अनिकेत भिलेगावकर, सिद्धेश्वर गायकवाड, राजरतन डोंगरे, विजय कापसे, रत्नाकर कुलथे, दर्शन डोंगरे, रवी राऊत, धनंजय माने, राज गायकवाड, बालासाहेब उफाडे, राम जगताप, अरविंद ओव्हाळ आदि पत्रकार बांधव उपस्थित होते.

मुप्टाच्या क्रांतीबा ज्योतिबा फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराची घोषणा

पुरस्कार वितरण सोहळा २९ डिसेंबर २०२४ रोजी संपन्न होणार

बीड। प्रतिनिधी

महाराष्ट्र अंडर प्रिव्हिलेज्ड टीचर्स असोसिएशनच्या (मुप्टा) वतीने देण्यात येणाऱ्या सन २०२४ च्या क्रांतीबा ज्योतिबा फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराची घोषणा जाहीर करण्यात आली असून बीड जिल्हा मुप्टाचे जिल्हाध्यक्ष मा. प्रा. प्रदीप रोडे यांच्या अध्यक्षतेखाली तुलसी इंग्लिश स्कूल, संत ज्ञानेश्वर नगर, बीड.येथे बैठक संपन्न झाली. बीड जिल्हा मुप्टाच्या वतीने क्रांतीबा ज्योतिबा फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त सर्व समावेशक कृतिशील कर्तृत्व करणाऱ्या शिक्षकांचा गुणगौरव करण्यात येतो. प्रति वर्षी प्रमाणे यावर्षी चे पुरस्कार वितरणाचे १६ वे वर्ष आहे असे पुरस्कार वितरण सोहळ्याचे मुख्य संयोजक व बीड जिल्हा मुप्टाचे अध्यक्ष, प्रा. प्रदीप रोडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे.शिक्षक प्राध्यापकांच्या न्याय हक्कासाठी लढणारी एकमेव लढाऊ संघटना म्हणून मुप्टाने आपली ओळख निर्माण केलेली आहे. तसेच सामाजिक क्षेत्रात विविध उपक्रम राबवून संघटनेने सामाजिक बांधिलकी जोपासलेली आहे. गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे या संदर्भात त्यांना हवे त्या मदतीचे कार्य करून जणूकाही शैक्षणिक नवक्रांती करण्याचे कार्य मागील अनेक वर्षापासून बीड जिल्हा मुप्टा करते आहे.

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी क्रांतीबा ज्योतिबा फुले यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून बीड जिल्हा मुप्टाच्या वतीने सलग १६ व्या वर्षी शैक्षणिक, साहित्य, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा रविवार दिनांक २९ डिसेंबर २०२४ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड. येथे सकाळी ठीक १० वाजता संपन्न होणार आहे. पुरस्कारार्थी- १. प्रा. डॉ. प्रतिभा जाधव, (आर्ट्स,कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, लासलगाव,जिल्हा नाशिक.) २. प्राचार्य भास्कर पाटील,(सुधाकरराव नाईक महाविद्यालय, अकोला.) ३. श्रीमती कीर्तीताई श्रीधरराव पांगरकर (साळुंके), (विनायक प्राथमिक विद्यालय, बीड.) ४. आयु. राहुल कांबळे, (युसुफ वडगाव हायस्कूल, युसुफ वडगाव, ता. केज जि. बीड.) ५. आयु. जालिंदर ठवरे, (जि. प. प्राथमिक शाळा,रेवकी ता.गेवराई जि. बीड.) ६. आयु. संजय कांबळे, (लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतुर, जि. जालना.) ७. प्राचार्य,संघमित्रा गोणारकर, (सावित्रीबाई फुले महिला बी.एड. कॉलेज,नांदेड.) ८. श्रीमती भावसार अश्विनी रामराव, (जि. प. प्राथमिक शाळा वाणीसंगम, जि. परभणी.) ९. आयु. वडमारे सचिन, (भगवान विद्यालय,बीड.) १०. आयु. गायकवाड दादासाहेब, (विवेकानंद विद्यालय,केज. जि. बीड.) ११. आयु. शामसुंदर बगाटे, (जि. प. प्राथमिक शाळा,लोणी, जि. परभणी.) १२. आयु.भादवे सुभाष, (जि. प. प्राथमिक शाळा, केरूळ, ता. आष्टी जि. बीड.) १३. श्रीमती रेणुका मुक्ताराम दोडके, (जि. प. प्राथमिक शाळा, थेरला, ता. पाटोदा जि. बीड.) १४. प्रा. डॉ. अनिता शिंदे, (सौ.के. एस. के. महाविद्यालय, बीड.) १५. आयु. गणेश मैंद, (विद्यानिकेतन माध्यमिक विद्यालय, जोडबोडसर, जि.छ. संभाजीनगर.) १६. हेमलता सुनील गजबे,(एम.एस.सी. नर्सिंग कॉलेज,जे.जे.हॉस्पिटल, मुंबई.) तरी या पुरस्कार सोहळ्यासाठी शिक्षणप्रेमी आणि समाजातील सर्वच घटकांनी व पुरस्कार प्राप्त शिक्षकांनी सहकुटुंब उपस्थित राहण्याचे आवाहन बीड जिल्हा मुप्टा संयोजन समिती यांच्या वतीने करण्यात आले आहे.

बीडचे शिक्षणाधिकारी माध्यमिक कार्यालय शिक्षकांच्या घोषणांनी दणाणले!

बीड । प्रतिनिधी

एकच मिशन जुनी पेंन्शन, शंभर टक्के अनुदान मिळालेच पाहिजे, आश्वासीत प्रगती योजना लागू करावी, बीएलओ व पर्यवेक्षकांसह सर्व अशैक्षणिक कामातून शिक्षकांची सुटका करा अशा घोषणांनी येथील शिक्षणाधिकारी माध्यमिक कार्यालय दणाणून गेले. मराठवाडा शिक्षक संघाच्या धरणे आंदोलनात शिक्षकांनी घोषणाबाजी केली.

शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांच्या पुर्ततेसाठी मराठवाडा शिक्षक संघाने १९ डिसेंबर रोजी मराठवाडाभर धरणे आंदोलनाची हाक दिली होती. मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम, जिल्हाध्यक्ष कालिदास धपाटे आणि जिल्हा सचिव गणेश आजबे यांच्या नेतृत्वाखाली येथील शिक्षणाधिकारी माध्यमिक कार्यालया समोर धरणे आंदोलन संपन्न झाले. जुनी पेंन्शन हा शिक्षक कर्मचाऱ्यांचा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. राज्य सरकारने सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना व युनिफाईड पेन्शन स्कीमचा प्रस्ताव राज्य सरकारी कर्मचारी शिक्षकां समोर ठेवला आहे परंतु कर्मचारी शिक्षक त्यामुळे समाधानी नाहीत. त्यामुळे जुनी पेंन्शन योजना जशीच्या तशी लागू करावी, विनाअनुदानित वा अंशत: अनुदानित शाळां वर्ग आणि तुकड्यांना प्रचलित अनुदान सुत्रा नुसार शंभर टक्के अनुदान देवून या शाळांवर वीस पंचेवीस वर्षां पासून विनावेतन वा अंशत: वेतनावर काम करणा-या हजारो शिक्षकांची वेठबिगारी संपवावी.

शिक्षक शिक्षकेतर कर्मचा-यांना तीन लाभांची आश्वासीत प्रगती योजना लागू करावी, सर्व माध्यमांच्या शाळांना शंभर टक्के अनुदान द्यावे या व इतर मागण्यांसाठी मराठवाडा शिक्षक संघाने आंदोलन आयोजित केले होते. माध्यमिक विभागाचे उपशिक्षणाधिकारी श्री नानाभाऊ हजारे साहेब व मोहनराव काकडे साहेब यांनी निवेदन स्वीकारले. मराठवाडा शिक्षक संघाचे माजी जिल्हाध्यक्ष तथा मार्गदर्शक डी.जी.तांदळे, केंद्र कार्यकारिणी सदस्य अशोक मस्कले, बंडू आघाव, युवराज मुरूमकर, विनोद सवासे, हेमंत धानोरकर, रमाकांत शेळके, मोहनराव शेळके,दत्तात्रय चव्हाण, अविनाश काजळे, नदीम युसूफ, पुरुषोत्तम येडे पाटील, ढोरमारे, घोडके एस. जे. यांच्यासह शेकडो शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आंदोलनात सहभागी झाले होते.

राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची पुण्यतिथी साजरी

परळी। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्थेच्या कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयांमध्ये आज दिनांक २० डिसेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. मधुकर आघाव म्हणाले की समाजातील अज्ञान व अंधश्रद्धा दूर करण्यासाठी गाडगे महाराज यांचे कार्य मोलाचे आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.बबन मोहिते यांनी केले तर आभार प्रा बबन झांजे यांनी केले कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांची उपस्थिती होती.

फुले पिंपळगाव गायरान जमिन हद्दखुणा मोजणीस भूअभिलेखची टाळाटाळ

सय्यद सलीम बापू यांचे भूमि अभिलेख; कार्यालयासमोर उपोषण

माजलगाव। प्रतिनिधी

महेंद्र शामराव साळवे यांनी गट नं.२० शिवार फुले पिंपळगाव मधील जमीनीची हद्दखुणा मोजणी करण्याचा अर्ज दिला होता.परंतु भू अभिलेख कार्यालयाने कोणत्याही हद्द खुणाची मोजणी केली नाही,उलट त्यांच्या अडाणीपणाचा गैरफायदा घेवून हद्दखुणा मोजणी करण्याऐथजी पोटहीश्याची मोजणी केली.दरम्यान अर्जदाराच्या मागणी नुसार मोजणी न केल्याने आंबेडकरी विचार मोर्च्याच्या वतीने सय्यद सलीम बापू यांनी शुक्रवार दि.२० डिसेंबर रोजी पासुन माजलगाव भू अभिलेख कार्यालयासमोर उपोषण सुरू केले.

महिंद्र श्यामराव साळवे यांनी आपल्या फुलेपिंपळगाव शिवारातील गट नं.२० गायरान जमिनीची हद्दखुणा करण्याची माजलगाव भूअभिलेख कार्यालयाकडे फीस भरून लेखी व तोंडी मागणी केली होती.अर्जदाराने प्रत्यक्ष भेटूनही अनेक वेळा विनंत्या केल्या होत्या.परंतु अर्जदाराच्या अज्ञानीपणाचा व निरक्षर असल्याचा गैरफायदा घेत येथील कर्मचारी अधिकाऱ्यांनी अर्जानुसार हद्दखुणाची मोजनी न करता पोट हिश्याची मोजणी केली.भूमी अभिलेख कार्यालयाच्या या टोलवाटोलवी प्रकाराबद्दल आंबेडकरी विचार मोर्चेच्या वतीने उपोषणाचा इशाराही देण्यात आला होता.परंतु मस्तवाल,गेंड्याची कातडी पांगरलेले भूमि अभिलेख कार्यालय गोरगरीब जनतेला वेठीस धरत आहे.जिल्हा अधिकारी साहेब यांच्या आदेशाला नाजूमानता अधिकाऱ्याची मनमानी कायद्याचा आणि पदाचा दुरुपयोग मागासवर्गीय समाजावर एक प्रकारच्या अन्याय हे अधिकारी करतात.विशेष करून मागासवर्गीय समाजाविषयी येथील कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांची भावना जातीय वृत्तीची आहे. मुद्दामहुन येथील उर्मट अधिकारी जनतेला वेठीस धरत आहेत.अशा मुजोर अधिकाऱ्यांना वटणीवर आणण्याचा अर्ज,करत आंबेडकरी विचार मोर्चा व आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा यांच्या वतीने सय्यद सलीम बापू यांनी भू अभिलेख कार्यालय माजलगाव येथे उपोषण सुरू केले.तात्काळ मोजणी करून हदखुणा करण्यात यावा. यावेळी त्यांच्यासोबत महेंद्र श्यामराव साळवे,सुरेश निवृत्ती साळवे,तात्यासाहेब सुखदेव साळवे,सुखदेव बाबुराव साळवे, सचिन सिताराम साळवे,संदिपान महादू साळवे,बाबासाहेब शेषराव डोंगरे .दीपक सिताराम साळवे. अनिकेत दीपक साळवे. वंचबाई नामदेव साळवे. रुक्मीनबाई सिताराम साळवे. सागर बाई साळवे. सुभाष राजूभाऊ साळवे. विशाल सिद्धार्थ डोंगरे. शिवा भगवान साळवे. माणिक शिंदे. शेख महबूब मेहमूद. विजय हरिभाऊ साळवे. मुकेश. शेख इलियास मासूम. सय्यद अल्ताफ नजीर .इत्यादींचा सहभाग आहे.

योग्य आहार हीच आरोग्यदायी जीवनाचा पाया-प्रा. अनुजा कंदी

बीड । प्रतिनिधी

केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात किशोरवयीन मुलांच्या आरोग्य विषयासंबंधी गृहशास्त्र विभागाच्या वतीने किशोरवस्था व आहार या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी दगडोजीराव देशमुख महाविद्यालय येथील प्रा.अनुजा कंदी यांनी मुलांना योग्य आहार विषयक मार्गदर्शन करतांना म्हणाल्या की, योग्य आहार ,सवयी असतील तरच पुढील आयुष्य हे निरोगी राहून आपले आयुष्य सुखकर जाते. तरी सर्व या वयातील विद्यार्थ्यांनी आहारात चांगल्या ताज्या भाज्या,फळे यांचा वापर करणे गरजेचे आहे. तरच आपण सदृढ व निरोगी राहाल. तसेच आपली मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार, वजनवाढ अश्या होणार्या विविध आजारापासून आपण दूर राहू शकतोत.घरा बाहेरील, रस्त्यावरील पाकीट बंद

रासायनिक पदार्थ किती हानीकारक आहेत हेही यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगीतले.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांनी योग्य सकस आहार,हिरव्या ताजा भाजीपाला जीवनात किती महत्वाचा आहे. तसेच हिरव्या भाजीपाल्यामध्ये अ जीवनसत्व लोह,प्रथिने असतात त्यामुळे जीवन निरोगी राहते. जास्तीतजास्त निरोगी राहण्यासाठी हिरवा भाजीपाला,कडधान्य याचा आपल्या आहारात जास्त उपयोग करावा व बाहेरचे अन्न खाणे टाळावे तसेच सकस आहार, आपल्या सवयी किती महत्वाच्या आहेत हे आपल्या अध्यक्षीय समारोपात विद्यार्थ्यांना समजावून सांगीतले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक गृहशास्त्र विभाग प्रमुख डॉ.वंदना फटाले यांनी तर कार्यक्रमाचे आभार डॉ.मंजूषा जाधव यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

सहा महिन्यात जिल्ह्यात झाल्या ८४८१ शस्त्रक्रिया

डॉ.अशोक थोरात यांनी आतापर्यंत केल्या ३२२१ शस्त्रक्रिया

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा रुग्णालयामध्ये महिलांच्या शस्त्रक्रियांसाठी होणारी गर्दी पाहता जिल्हा शल्य चिकित्सक अशोक थोरात यांनी प्रत्येक जिल्ह्यातील आरोग्य केंद्र यामध्ये वार ठरवून शस्त्रक्रिया सुरू केल्यामुळे एप्रिल ते सप्टेंबर २०२४ या सहा महिन्याच्या कार्यकाळामध्ये जवळपास ८४८१ या प्रक्रिया करण्यात आल्या महिलांच्या प्रसूती नॉर्मल डिलिव्हरी सिजर या शस्त्रक्रियांचा यामध्ये समावेश असून डॉक्टर अशोक थोरात यांनी पदभार घेतल्यानंतर त्यांच्या कार्यकाळात दोन महिन्यांमध्ये ३२२१ शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

जिल्हा रुग्णालय मध्ये महिलांच्या विविध शास्त्रक्रिया कुटुंब कल्याण प्रसुती यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होत होती मात्र जिल्हा रुग्णालयांतर्गत असलेले उपकेंद्र त्याचबरोबर प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी आता या शास्त्रक्रिया करण्यास सुरुवात झाल्याने जिल्हा रुग्णालयामधील होणारी गर्दी कमी झाली आहे प्रामुख्याने एप्रिल २०२४ ते सप्टेंबर २०२४ या कार्यकाळामध्ये जिल्ह्यातील विविध रुग्णालयांमध्ये जवळपास ८४८१ शस्त्रक्रिया करण्यात आल्या यामध्ये एकूण प्रसूती ४१३६ नॉर्मल डिलिव्हरी २४१५ सिजर १७२१ तर जिल्हा रुग्णालय मध्ये २०९ अशा शस्त्रक्रिया करण्यात आल्या या सहा महिन्याच्या कार्यकाळामध्ये जिल्हा आरोग्य यंत्रणेने दाखवलेली तत्परता यामुळे जिल्हा रुग्णालयात होणारी गर्दी थोडीफार कमी झाली आणि प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी आरोग्य उपकेंद्र ग्रामीण रुग्णालय या ठिकाणी होणाऱ्या शस्त्रक्रियेमुळे रुग्णांची देखील सोय झाली आहे यातच जिल्हा शल्य शिक्षक डॉक्टर अशोक थोरात एक १० २०२४ पासून रुजू झाले त्यांनी ऑक्टोबर व नोव्हेंबर २०२४ या कार्यक्रमांमध्ये जवळपास ३२ २१ शस्त्रक्रिया केल्या आहेत त्यामध्ये जिल्हा रुग्णालयात १६०६ प्रसूती ८२४ नॉर्मल डिलिव्हरी तर ७८२ सिजर अशा शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

डॉक्टर थोरात यांच्या कार्यकाळात ३२२१ शस्त्रक्रिया

डॉक्टर अशोक थोरात यांनी एक आक्टोबर २०२४ रोजी पदभार घेतल्यानंतर ऑक्टोबर मध्ये ८७७ प्रसूती ४८२ नॉर्मल डिलिव्हरी तर ३९५ सिजर नोव्हेंबर २४ मध्ये ७२९ प्रसूती ३४२ नॉर्मल डिलिव्हरी तर ३८७ सिजर शस्त्रक्रिया करण्यात आल्या यातील पाच जिल्हा रुग्णालयांमध्ये तर इतर तालुका ठिकाणी असलेल्या उपकेंद्र वर स्वतः जाऊन शस्त्रक्रिया केल्या आहेत

पिंपळवंडी येथे गाडगे महाराज पुण्यतिथी साजरी

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे दि.२०/१२/२०२४ शुक्रवार रोजी ग्रामपंचायत कार्यालय,जिल्हा परिषद शाळा तसेच,गोकुळ राऊत यांच्या हॉटेलमध्ये राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.यावेळी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून पूजन करण्यात येऊन प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.यावेळी डी.के.पवार सर,बाबासाहेब राऊत,संतोष वाघमारे,जालिंदर पवार,गोकुळ राऊत,राजू माळी,पत्रकार के.टी.पवार,अतुल राऊत,राहुल पवार,नागेश शहाणे,श्रीकांत उकांडे,जयसिंग जरे,बद्री पवार,कृष्णा पवार,मयूर राऊत व ग्रामस्थ उपस्थित होते.

संतोष देशमुख यांच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी सरकारने उचलावी –डॉ ज्योती मेटे

बीड । प्रतिनिधी

मस्साजोग येथील तरुण सरपंच संतोष देशमुख यांच्या प्रकरणांमध्ये राज्याचे मा. मुख्यमंत्री यांनी सदनांमध्ये उत्तर देत असताना संबंधित आरोपी विरुद्ध मोक्का लावण्याची केलेली घोषणा तसेच एसआयटी व न्यायालयीन चौकशीची केलेली घोषणा महाराष्ट्राच्या गृहमंत्री या नात्याने त्यांच्या संवेदनशीलतेचे प्रतिक आहे. कुटुंबीयांना त्यांनी आर्थिक मदत देखील जाहीर केलेली आहे. याकरिता राज्याच्या मुख्यमंत्र्याचे मनःपूर्वक आभार व्यक्त करत शिवसंग्राम अध्यक्ष डॉ ज्योती विनायकराव मेटे यांनी संतोष देशमुख यांच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी सरकारने उचलावी अशी मागणी थेट मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

संतोष देशमुख यांच्या निधनानंतर देशमुख कुटुंबियांचा करता आणि कमविता घरातील व्यक्ती गेला आहे त्यामुळे या कुटुंबाच्या पुढील जीवनात अनेक अडचणी निर्माण होणार आहेत देशमुख कुटुंब पूर्णपणे संतोष देशमुख यांच्यावर अवलंबून होते त्यांच्या जाण्याने आता त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न देखील उभा राहिला आहे. त्यामळे संतोष देशमुख यांच्या मुलांचे शैक्षणिक खर्चासाठी तरतुदी करिता शासनाकडून विशेष बाब म्हणून त्यांचे शैक्षणिक शुल्क अदा करणे तसेच अनुषंगिक खर्च देण्याबाबत विचार करण्यात यावा अशी मागणी डॉ. ज्योती मेटे यांनी केले आहे.

तक्रार करताच प्रशिक्षकाचे मानधन अदा

प्रवीण प्रशिक्षक सय्यद यांनी केली होती उप मु.का.अ.कडे तक्रार

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये राजस्थानच्या स्टुडन्ट रिलीफ सोसायटी जयपुर यांच्या वतीने घेतल्या जात असलेल्या प्रशिक्षणामध्ये यशदाचे प्रवीण प्रशिक्षक सय्यद नय्युम पापामिया हे प्रशिक्षण घेत होते .मात्र काही कारणामुळे त्यांना या प्रशिक्षणापासून दूर करून त्यांचे सात दिवसाचे मानधन स्टुडन्ट रिलिफ सोसायटी जयपुर ने अदा न करता त्यांना प्रशिक्षणापासून बाजूला केले सय्यद यांनी याची तक्रार पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केल्यानंतर हे मानधन त्वरित अदा करण्यात आले मात्र यामध्ये प्रतिदिन पाचशे रुपये कमी देण्यात आले इतरांना दोन हजार रुपये दिले जातात मात्र सय्यद यांना १५०० रुपये देण्यात आले हे सर्व आकस बुद्धीने चालू असून या संस्थेची चौकशी करावी असी मागणी होत आहे.

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सय्यद यांनी बीड येथे जवळपास सहा दिवस प्रशिक्षणात सहभाग घेतला तर आष्टी चे दोन दिवस प्रशिक्षण केले. या प्रशिक्षणाचे मानधन त्यांना देण्यात आले नाही. त्यामुळे त्यांनी पाणीपुरवठा स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार केली. या तक्रारीनंतर त्यांना तीन हजार रुपये कपात करून मानधन देण्यात आले. या संदर्भात मानधनाचा अहवाल संबंधित संस्थेकडून मागून घ्यावा आणि प्रशिक्षणाचे मानधन आणि प्रशिक्षक प्रवीण आहेत का? याची चौकशी करावी जोपर्यंत त्याची चौकशी होत नाही तोपर्यंत प्रशिक्षण पूर्ण झाले असा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी देऊ नये अशी विनंती सय्यद यांनी निवेदनाद्वारे केली होती. मानधन देत असताना तीन हजार रुपये कपात करून मानधन देण्यात आले. मात्र त्यांना अचानक या प्रशिक्षणातून का वगळण्यात आले? हे मात्र स्पष्ट होत नाही. याचा जाब संबंधीत संस्थेला मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी विचारावा असी मागणी होत आहे. या संदर्भात प्रवीण प्रशिक्षक ◀◀ पान ३ वर

रेल्वे पुलाच्या कामासाठी वळण रस्ता २० दिवस बंद

बीड । प्रतिनिधी

बीड शहरानजिक रेल्वे पूलाचे काम सुरु असल्याने मार्गालगत असणारा वळण रस्ता बंद करण्यात येणार असून वाहनधारकांनी पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सध्या कपिल मुनी मंदिर पासून ज्या मार्गाने बीड रोड ओलांडून वाहने सध्याच्या वळण रस्त्याने जातात त्या रेल्वेमार्गालगतच्या वळण रस्त्यावर वाहतूक पुढील १५ ते २० दिवस बंद राहणार आहे, असे रेल्वेतर्फे जारी एका प्रसिध्दीपत्रात म्हटले आहे.

सततच्या 'बंद' ला दिंद्रूडकर पुरते वैतागले

व्यापाऱ्यांनी कर्जाचे हफ्ते फेडायचे कसे?

दिंद्रुड । प्रतिनिधी

वेगवेगळ्या कारणांमुळे पुकारण्यात येणाऱ्या सततच्या बंदला दिंद्रूडकर व व्यापारी आता पुरते वैतागले आहेत. छोटे – मोठे व्यवसाय व उद्योग यांची तर वाट लागली आहे. अनेकाचे या बंदमुळे कंबरडे मोडले आहे. छोटे दुकानदार भरडून निघत आहेत. ज्यांनी कर्ज काढून व्यवसाय उभारले आहेत त्यांना दिवसा तारे दिसत आहेत. कर्जाचे हफ्ते फेडायचे कसे असा यक्ष प्रश्न व्यापाऱ्यांपुढे पडत आहे. त्यामुळे राजकीय पुढारी, सामाजिक कार्यकर्ते व लोकप्रतीनिधींनी यातून समंजसपणे काहीतरी मार्ग काढावा अशी मागणी व्यापारी वर्गातून होत आहे.

माजलगाव तालुक्यातील दिंद्रूड ही सर्वात मोठी बाजारपेठ आहे. व्यावसायिक दृष्ट्या अतिशय झपाट्याने वाढत असलेल्या मार्केटला बाहेरील व्यापारीवर्ग पहिली पसंती देतात. भुसार पासून ते सोन्याचांदीची खरेदी – विक्री मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे दररोज लाखोंची उलाढाल होते. फर्टीलायझर, सोयाबीन व कापूस यांची उलाढाल तर काही कोटी रुपयांत होते. इथला शेकडो वर्षांपासून भरणारा आठवडी बाजार पंचक्रोशीत लोकप्रिय आहे. मात्र मागच्या काही वर्षांपासून कोणत्या ना कोणत्या कारणाने सतत होणाऱ्या बंद मुळे व्यापारी वर्गाला अनेक अडचणीला तोंड द्यावे लागत आहे. तेंव्हा जानकार व सुज्ञ लोकांनी याबाबत पुढाकार घेऊन सामंजस्याने यातून काहीतरी मार्ग काढावा अशी व्यापाऱ्यांची अपेक्षा आहे.

लोकशाहीत भारतीय राज्यघटनेने जनतेला आपले प्रश्न सोडवण्यासाठी किंवा निषेध व्यक्त करण्यासाठी बंदचे हत्यार दिले आहे. मात्र याचा आता सर्रास वापर होत असल्याचे दिसून येत ◀◀ पान ३ वर

संत गाडगेबाबांनी कीर्तनातून समाजप्रबोधन आणि कृतीतून स्वच्छतेचा मंत्र दिला – प्राचार्य मुकुंद देवर्षी

माजलगाव । प्रतिनिधी

संत गाडगेबाबा लोकशिक्षक, प्रबोधनकार, युगपुरुष होते. गाडगेबाबांनी कीर्तनातून समाजप्रबोधन आणि कृतीतून स्वच्छतेचा मंत्र दिला.असे मत प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी यांनी व्यक्त केले, ते श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात रासेयो विभाग आयोजित संत गाडगेबाबा पुण्यतिथीनिमताने आयोजित कार्यक्रमात बोलत होते.पुढे बोलताना डॉ. देवर्षी म्हणाले मानवतेचे खरे परोपकारी सामाजिक समरसतेचे मूर्त स्वरूप संत गाडगेबाबा होते.जनसेवा हीच ईश्वर सेवा मानून अहिंसा आणि प्राणिमात्रावर दया करा असे गाडगेबाबा उपदेश केले.

आपल्या मनोगतात डॉ. ज्ञानेश्वर गवते यांनी संत गाडगे महाराज यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकून संत गाडगेबाबा यांच्या विचाराची आजची उपयोगिता सांगितली. प्रास्ताविक डॉ. कमलकिशोर लड्डा यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सुनील पाटील केले, तर कार्यक्रमाची सांगता शांतिमंत्राने झाली. कार्यक्रमासाठी उपप्राचार्य डॉ. गजानन होंन्ना, प्रा.अंकुश साबळे, प्राध्यापक कर्मचारी, स्वयंसेवक विध्यार्थी उपस्थित होते.

रोजगार हमी योजनेतील मजुरांच्या खात्यात २ हजार ८५६ कोटी रुपये जमा

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील रोजगार हमी योजनेतील मजुरांच्या बँक खात्यामध्ये सन २०२४– २५ मध्ये २ हजार ८५६.३० कोटी रुपयांचा निधी जमा करण्यात आल्याची माहिती रोजगार हमी योजना विभागाकडून देण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत १०० दिवसांपर्यंतची मजुरी केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीमधून दिली जाते. तर १०० दिवसांच्या वरील मजुरी राज्य शासनाच्या निधीतून दिली जाते. त्यानुसार सन २०२४–२५ मध्ये १०० दिवसांपर्यंत मजुरीचे २ हजार ६१६.३० कोटी निधी आणि १०० दिवसांवरील मजुरीचे २४० कोटी रुपये असा एकूण २ हजार ८५६.३० कोटी निधी मजुरांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात आला आहे. केंद्र व राज्य शासनाकडून सन २०२४–२५ मध्ये अनुक्रमे ६६.२१ कोटी व ५.८८ कोटी रुपये असा एकूण ७२.०९ कोटी इतका निधी मजुरीपोटी पालघर जिल्ह्यातील मजुरांच्या खात्यात जमा करण्यात आला असल्याची महितीही 'रोहयो' विभागाने दिली आहे.

अशोक ज्ञानोबा कदम यांचे निधन

दिंद्रुड । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील जवळा येथील अशोक ज्ञानोबा कदम वय ५२ वर्ष यांचे शुक्रवारी सकाळी दहा वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्यात दुःखद निधन झाले. दुपारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी,दोन विवाहित मुले,नातवंडे असा परिवार आहे. धार्मिक वृत्तीचे अशोक कदम यांनी शुक्रवारी सकाळी नित्यनेमाप्रमाणे ज्ञानेश्वरी पठण केली. तर नंतर लगेच त्यांना हृदयविकाराचा तिव्र झटका आला आणि त्यांची प्राणजो तिथेच मावळली. या दुःखद घटनेने जवळा व पंचक्रोशीतील वारकरी संप्रदायिक जनतेत हळहळ व्यक्त होत आहे.

गुणवत्ता तपासणीसाठी गटशिक्षणाधिकारी उजगरे यांच्या शाळांना अचानक भेटी; गुणवत्ता पाहून व्यक्त केले समाधान

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष तथा कार्यतत्पर गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी काल दि.१७ मंगळवार रोजी शाळांमधील गुणवत्ता तपासणीसाठी अचानक वडवणी तालुक्यातील चिंचवण केंद्रातील सवासेवाडी शाळेसह इतर काही शाळांना अचानक भेटी दिल्या व येथिल विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता तपासून या दुर्गम भागातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता पाहून त्यांनी शिक्षकांच्या कामाचे कौतुक करुन समाधान व्यक्त केले.

याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष तथा कार्यतत्पर गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी काल दि.१७ डिसेंबर २०२४ मंगळवार रोजी सकाळी ९ वाजतापासून शाळांमधील गुणवत्ता तपासणीसाठी

अचानक वडवणी तालुक्यातील चिंचवण केंद्रातील सवासेवाडी शाळेसह इतर काही शाळांना अचानक भेटी दिल्या. पहिली भेट दिलेल्या सवासेवाडी शाळेतील विद्यार्थ्यांचा दैनंदिन परिपाठ गटशिक्षणाधिकारी उजगरे यांच्या उपस्थितीत पार पाडला. यावेळी त्यांच्या समवेत चिंचवण केंद्राचे केंद्रप्रमुख सुनिल मुंडे सर, वडवणी केंद्राचे केंद्रप्रमुख सुरेश कराडे सर, वडवणी कन्या केंद्राचे केंद्रप्रमुख शेख सैलानी सर उपस्थित होते. या भेटीमध्ये गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे व सहकारी यांनी भेट दिलेल्या शाळांची गुणवत्तेची सखोल तपासणी केली. यामध्ये सवासेवाडी शाळेतील सर्व विद्यार्थी इंग्रजी व मराठी उत्तमरित्या वाचन व लेखन करत असल्याचे त्यांना दिसून आले. तसेच गणित विषयातील पायाभूत क्षमता यांची तपासणी करुन समाधान व्यक्त केले. आणि मागील वर्षी मंथन व ओलिम्पीयाड स्पर्धा परिक्षेत राज्य व तालुका स्तरावर यश संपादन केलेले चि.अथर्व नागरगोजे, कु.तनिष्का बडे, प्रणाली सवासे, संस्कृती सवासे, विराट मुंडे व इतर सर्व मुलांचे साहेबांनी कौतुक करुन त्यांना ◀◀ पान ३ वर

पोलीस आणि महसूल लाचखोरीत आघाडीवर

वर्षभरात २८ लाचखोरावर गुन्हे दाखल २५ लाखाची एकूण लाचेची रक्कम

बीड । प्रतिनिधी

लाच देणे आणि घेणे हा कायद्याने गुन्हा आहे मात्र प्रशासनामध्ये असलेल्या लोकसेवकांनी वर्षभरामध्ये लाच घेण्याचे अनेक गुन्हे घडले आहेत यामध्ये महसूल आणि पोलीस खाते सर्वात पुढे असल्याचे वर्षभरातील प्रतिबंध विभागाने केलेल्या कारवाईतून पुढे आले आहे वर्षभरात जवळपास २८ लाचखोरांना ताब्यात घेतले असून २९ गुन्हे दाखल आहेत तर यातील लाचेची रक्कम ही २५ लाख ४५ हजार रुपये एवढी आहे.

शासकीय कामकाजामध्ये अनेक ठिकाणी लाचेचे प्रकार शासकीय कर्मचाऱ्याकडून घेण्याचे घडत आहेत अनेक वेळा लाच पोहोचवत प्रतिबंधक विभाग या संदर्भात प्रमुख



कार्यालयात दर्शनी भागावर बोर्ड लावले शिवाय अनेक वेळा आवाहन केले जात आहेत लाचेची मागणी केल्यास आमच्याकडे तक्रार करा याबरोबरच कोणीही लाज देऊ नये किंवा घेऊ नये असे आवाहन केले जात असले तरी प्रामुख्याने लाच घेण्याचे प्रकार घडतच आहेत जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२४ या एक वर्षाच्या कार्यकाळामध्ये लास्ट प्रतिबंधक विभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी त्यांच्याकडे आलेल्या तक्रारीवरून मोठ्या कारवाई केल्या लासलुस्पद प्रतिबंध विभागाचे पोलीस उपाधीक्षक शंकर शिंदे यांनी दिलेल्या वर्षभराच्या माहितीवरून या विभागाने आतापर्यंत एकूण ५८ आरोपी विरुद्ध २९ गुन्हे दाखल केले आहेत यामध्ये महसूल विभागात एकूण सात गुणे घडले असून यात १२ आरोपींना अटक केली आहे तर त्यामध्ये १२ लाख रुपयाची एकूण राज्याची रक्कम आहे जिल्हा परिषद व शिक्षण विभागांमध्ये दोन गुन्हे घडले असून पाच आरोपींना अटक केली यामध्ये आठ हजार रुपये लाचेची मागणी केली पोलीस विभागांमध्ये सर्वाधिक १५ आरोपींना अटक केली असून यामध्ये सहा गुन्हे दाखल असून त्यांच्याकडून आठ लाख तीस हजार रुपये एवढ्या लाचेची रक्कम जप्त केली गेली आहे पाटबंधारे विभागामध्ये दोन गुन्हे असून दोन आरोपींना ३१ हजार रुपयाची लाच घेताना ताब्यात घेतली नगररचना विभागांमध्ये तीन गुन्हे दाखल असून यात सात ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

पुण्यातील नराधम डान्स शिक्षकाचे कारनामे दोन वर्षांनी उघड; अजून काही तक्रारी येण्याची शक्यता

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील नामांकित शाळेतील अल्पवयीन मुलांवर डान्स टिचरकडून लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला होता. दरम्यान, या प्रकरणी आता पोलिसांनी शाळेतील डान्स टिचरसह संस्थाचालकाला अटक केली आहे.अल्पवयीन मुलांचा डान्स टिचरने लैंगिक छळ केल्याप्रकरणी नामांकित शाळेच्या संस्थाचालकाला अटक करण्यात आली आहे. अन्वित पाठक अस संस्थाचालकाचं नाव आहे. याप्रकरणी पोलिसांनी माहिती देताना सांगितलं की, या प्रकरणात अजून काही तक्रारी येण्याची शक्यता असल्याचं पोलीस उपायुक्त संभाजी कदम यांनी सांगितले आहे.

पुण्यातील एका नामांकित शाळेत चौथ्या वर्गाची होणाऱ्या आणि सहाव्या वर्गात शिकणाऱ्या मुलावर डान्स टीचरने अश्लील चाळे केले. त्यानंतर या डान्स टीचरला अटक करण्यात आली. त्यासोबत शाळेच्या संस्थाचालक अन्वित फाटक यांना देखील अटक करण्यात आली आहे. या प्रकरणात दोन तक्रारी दाखल झाल्या होत्या, त्यात एका पालकाने संस्थाचालक असलेल्या अन्वित फाटक यांच्या विरोधात देखील तक्रार दाखल केली होती, त्यावरून पोलिसांनी फाटक यांना अटक केली आहे. त्याचबरोबर दोन विद्यार्थ्यांसोबत ही घटना घडल्याचा प्रकार समोर आल्यानंतर पुन्हा दोन पालकांनी आपल्या मुलासोबत असाच घडल्याची तक्रार पोलिसांना दिली आहे. आणि या प्रकरणात अजून काही तक्रारी येण्याची शक्यता असल्याचं पोलीस उपायुक्त संभाजी कदम यांनी सांगितले आहे.

पुण्यातील एका नामांकीत शाळेत मंगेश साळवे या डान्स टीचरकडून मागील दोन वर्षांपासून शाळेतील मुलांवर लैंगिक अत्याचार केले जात होते. मंगेश साळवे हा शाळेतील सहावी, सातवी मधील मुलांना अनेकदा शाळेच्या बाथरुममध्ये नेऊन त्यांच्याशी अश्लील चाळे करत होता. शाळेतील शिक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांच्या दोन वर्षे ही बाब लक्षात आली नाही. एका मुलाला मंगेश साळवेकडून शारिरीक इजा झाल्यानंतर त्याने ती बाब त्याच्या पालकांना सांगितली. त्यानंतर आणखी तीन पालकांनी देखील त्यांच्या पाल्याबाबत असाच प्रकार घडल्याची तक्रार दाखल केली आहे. पालकांनी मंगेश साळवे या शिक्षकाबरोबरच संस्थाचालक अन्वित फाटक यांचा आणि संस्थेचा निष्काळजीपणा या अत्याचारांना कारणीभुत ठरल्याची तक्रार पोलीसांकडे केली आहे. पालकांच्या या तक्रारीनंतर पोलिसांनी शिक्षक असलेला मंगेश साळवे आणि संस्थाचालक अन्वित फाटक यांना अटक केली.

पुण्यातील कर्वेनगर-कोथरूड परिसरातील एका शाळेत आरोपी मंगेश साळवे हा डान्स टीचर म्हणून कार्यरत होता. नृत्य शिकवत असताना साळवे हा शालेय विद्यार्थ्यांच्या शरीराला जाणून बुजून हाथ लावत असे. एका ११ वर्षीय विद्यार्थ्याने त्याच्याबाबत घडलेला प्रकार समुपदेशन सुरू असताना सांगितला आणि त्यानंतर त्याच्या आई वडिलांना देखील याबाबतची माहिती दिली आणि तात्काळ त्यांनी पोलिसात धाव घेतली. पोलिसांनी सुद्धा प्रकरण गांभीर्याने घेत शिक्षक मंगेश साळवे याला अटक केली. यापूर्वी सुद्धा त्याने इतर विद्यार्थ्यांवर लैंगिक छळ केल्याचे समोर आल होतं. आरोपीवर अशा प्रकारचा गुन्हा केल्याप्रकरणी आणखी एका गुन्हा दाखल करण्यात आला होता.

कंत्राटी रुग्णवाहिका चालकांना पगारच नाही

पुणे । प्रतिनिधी

जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांवरील अत्यावश्यक सेवेतील रुग्णवाहिका सेवा पुरविणार्या कंत्राटी रुग्णवाहिका चालक व आरोग्य केंद्राच्या सफाई कामगारांना गेल्या दहा महिन्यांपासून पगारच मिळालेला नाही. त्यामुळे त्यांना आर्थिक संकटास सामोरे जावे लागत आहे. दरम्यान, शासनाकडूनच जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाला अनुदान येत नसल्याने वेतन थकले आहे.

जिल्ह्यातील ग्रामीण भागात १०२ क्रमांकाच्या रुग्णवाहिकेमार्फत नवजात शिशू, बाळंतीण महिला, गरोदर मातांची तपासणी, ऑपरेशन शिबिरासाठी येणार्या महिलांना ने-आण करणे, तसेच सर्पदंशसारख्या रुग्णांसह दर महिन्याला आरोग्य केंद्रात औषधे व लस आणणे आदी अत्यावश्यक सेवा देण्यात येतात. ही सेवा पुरविताना रुग्णवाहिका चालक महत्त्वाची जबाबदारी पार पाडत असतो. परंतु, त्यांच्याच पगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे.

सुमारे दोन वर्षांपासून पुणे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने शारदा सर्व्हिसेस या सेवा देणाऱ्या कंपनीला रुग्णवाहिका चालक व सफाई कामगार पुरविण्याचे कंत्राट दिल्याचे समजते. या माध्यमातून पुरंदर तालुक्यातील निरा, वाल्हे, बेलसर, माळशिरस, परिंचे या आरोग्य केंद्रांसह जिल्ह्यातील ९६ आरोग्य केंद्रांत रुग्णवाहिका चालक व सफाई कामगार सेवा देत आहेत. एक वर्षापासून शारदा सर्व्हिसेसकडून कंत्राटी कामगारांना वेळेवर पगार मिळत नाही. मार्च-एप्रिल २०२४ या महिन्यांपासून कामगारांना वेतन मिळालेले नाही. त्यामुळे त्यांच्या कुटुंबाची अवस्था बिकट झाली आहे. याबाबत शारदा सर्व्हिसेसचे व्यवस्थापक विनय सपकाळ म्हणाले की, ऑक्टोबर २०२३ पासून मला जिल्हा परिषदेकडून बिल मिळालेले नाही. जवळच्या पैशातून कामगारांचे मार्च २०२४ पर्यंतचे पगार दिले आहेत. जिल्हा परिषदेकडे सतत पाठपुरावा करूनही जि. प. प्रशासन निधी नसल्याचे कारण सांगत आहे.

मुलबाळ होत नसल्याने पत्नीचा खून; पतीला जामीन

पुणे – मुलबाळ होत नसल्याच्या कारणावरून पत्नीचा गळा आवळून पतीने खून केल्याची घटना घडली होती. या प्रकरणात पती देवानंद मच्छिंद्र

काळेल (रा. वळई, ता. माण, जि. सातारा) याला भारती विद्यापीठ पोलिसांनी अटक केली होती. त्याला जामीन मिळाला आहे. त्याने ॲड. रमेश खेमू राठोड यांच्यामार्फत जामिनासाठी अर्ज केला होता.

ॲड. राठोड यांना ॲड. आकांक्षा जाधव, चैतन्य पवार, प्रियांका कदम, ॲड. सुनिता खवले आणि यशस्वी चक्रनारायण यांनी सहकार्य केले. काजल काळेल यांच्या मृत्यूप्रकरणी वडील मारूती पितांबर बाड यांनी फिर्याद दिली आहे.

१८ मार्च २०२२ रोजी ही घटना घडली होती. देवानंद याला मद्याचे व्यसन आहे. जुलै २०२१ मध्ये दोघांचा विवाह झाला होता. तो घरातील इतर कारणे आणि मुलबाळ होत नसल्याच्या कारणावरून काजल यांना मारहाण करत असे. घटनेच्या दिवशी तिचा खून केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. त्याने गुन्हा केला नाही. त्याला खोट्या गुन्ह्यात अडकविले आहे. त्याने तिचा खून केलेला नाही. आजारपणाला कंटाळून तिने आत्महत्या केली आहे. गुन्ह्याचा तपास पूर्ण झाला आहे. दोषारोपपत्र दाखल झाले आहे. त्यामुळे त्याला जामीन देण्याची मागणी बचाव पक्षातर्फे ॲड. रमेश खेमू राठोड यांनी केली.

भीषण अपघात ! ताम्हिणी घाटात बस दरीत कोसळून ५ जण ठार ; २७ जण गंभीर जखमी

पुणे । प्रतिनिधी

ताम्हिणी घाटाजवळ एका धोकादायक वळणावर बसला भीषण अपघात झाला असल्याची माहिती समोर आलीय. बस दरीत कोसळून पाच जण जागीच ठार झाल्याचे सांगण्यात येत आहे. तर २७ जखमी लोकांना बाहेर काढून माणगाव ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले. बचाव पथक आणि पोलिस घटनास्थळी काम करत आहेत. बस चाकण इथून महाडला लग्नासाठी जात असताना आज सकाळच्या सुमारास अपघात झाल्याची माहिती मिळत आहे. बसमध्ये ४० च्या आसपास प्रवासी असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.

ताम्हिणी घाटातील वॉटरफॉल पॉईंटजवळ भीषण अपघात घडल्याची घटना उघडकीस आली आहे. एका प्रवासी ट्रॅव्हलसच्या चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने ती पलटी झाली असून या दुर्घटनेत पाच जण जागीच ठार झाल्याची माहिती मिळत आहे. तसेच, अनेक प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. ही ट्रॅव्हल्स चाकणवरून वीरवाडीला (महाड), लग्नाला चालली होती.

मृतांमध्ये तीन महिला आणि दोन पुरूषांचे मृतदेह बाहेर काढल्याची माहिती मिळत आहे. अपघातस्थळी बचावकार्य सुरू असून अनेकजण गंभीर जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान, मृतांची संख्या वाढण्याची भितीही व्यक्त केली जात आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. ट्रॅव्हल्समध्ये अडकलेल्या अनेकांना बाहेर काढण्यात आलं.

फिडर पिलरचा शॉक बसून मुलगी गंभीर जखमी

पुणे : महावितरणच्या भोंगळ कारभारामुळे एका मुलीचा जीव संकटात सापडला. विमाननगर चौक येथील एच टी फिडर पिलरच्या उच्च दाबाच्या वायरचा धक्का लागल्याने दिव्या शेखर भोसले (वय १२, रा. शिरूर) ही मुलगी गंभीर जखमी झाली आहे. तिला ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

विमाननगर चौकात एच टी फिडर पिलरचे तीन बॉक्स आहेत. या रस्त्यावर गुलाबाची फुले तसेच इतर साहित्य विकून उपजीविका करणारे गरीब कुटुंब राहतात. दिव्या आईसोबत या ठिकाणी शिरूर येथून आजच गुलाबाची फुले विकण्यासाठी आली होती. सकाळी साडेअकराच्या सुमारास दिव्या लघुशंका करण्यासाठी एच टी फिडर पिलरच्या बॉक्सजवळ गेली. अति उच्च दाबाच्या वायरशी संपर्क आल्याने ती गंभीर जखमी झाली. तिची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात आले.

युगेंद्र पवारांची मतदान यंत्राची तपासणी प्रक्रियेतून माघार; कारण अस्पष्ट; नेत्यांच्या भुवया उंचावल्या

बारामती । प्रतिनिधी

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये बारामती मतदारसंघातून महायुतीकडून अजित पवारांनी तर महाविकास आघाडीकडून युगेंद्र पवारांनी निवडणूक लढवली. बारामती मतदारसंघातून अजित पवारांनी विक्रमी मतांनी बाजी मारली. त्यानंतर युगेंद्र पवारांनी मतमोजणी प्रक्रियेत घोळ झाल्याचा आरोप करत फेरमतमोजणीसाठी अर्ज केला होता. त्यानंतर आता अचानक बारामती विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार युगेंद्र पवार यांनी मतदान यंत्रांच्या तपासणीतून माघार घेतली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवारांच्या पक्षाच्यावतीने मतदान यंत्राविरोधात आंदोलनाची हाक दिल्यानंतर युगेंद्र पवार यांनी अचानकपणे फेर मतमोजणीच्या प्रक्रियेतून माघार घेतल्याने नेत्यांच्या

भुवया उंचावल्या आहेत. अनेकांनी याबाबत आश्चर्य व्यक्त केले आहे. युगेंद्र पवारांनी याबाबत जिल्हा निवडणूक शाखेकडे अर्ज केला आहे.

विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर पुणे जिल्ह्यातील ११ मतदारसंघांमधील महाविकास आघाडीच्या पराभूत उमेदवारांनी मतदान यंत्राच्या तपासणीसाठी जिल्हा निवडणूक शाखेकडे अर्ज केला होते. यामध्ये शरद पवारांच्या पक्षाचे ८ व काँग्रेसच्या ३ उमेदवारांचा समावेश आहे. यामध्ये शिरूरमधील अशोक पवार, बारामतीतील युगेंद्र पवार, हडपरसमधील प्रशांत जगताप, चिंचवडमधील राहुल कलाटे, खडकवासलामधील सचिन दोडके, पर्वतीमधील अश्विनी कदम, भोसरीमधील अजित गव्हाणे, तर दौंडमधील रमेश थोरात यांचा समावेश आहे. पुणे कॅन्टोन्मेंटमधील रमेश बागवे, पुरंदरमधील संजय जगताप व भोरमधील संग्राम थोपटे यांचाही समावेश होता. या निवडणुकीमध्ये अजित पवारांनी पुन्हा एकदा विक्रमी मतांनी विजय मिळवला होता. अजित पवारांना १,९६,६४० तर युगेंद्र पवारांना ८०,४५८ इतकी मते मिळाली आहेत. अजित पवार १,१६,१८२ मतांनी विजयी झाले आहेत. अजित पवारांना २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत पडलेली तशीच रेकॉर्डब्रेक मते मिळाली आहेत. मतमोजणीसाठी अर्ज करताना संबंधित मतदारसंघामधील एकूण मतदान केंद्रांच्या पाच टक्के केंद्रांवरील मतदान यंत्रांची पडताळणी केली जाते. या मतदान केंद्रातील यंत्राची पडताळणी करण्यासाठी प्रत्येकी ४२ हजार ५०० रुपये अधिक १९ टक्के जीएसटी आकारून एकूण ४७ हजार २०० रुपये आकारले आहेत. त्यानुसार या उमेदवारांनी ६४ लाख ६६ हजार ४०० रुपये जिल्हा निवडणूक शाखेकडे जमा केले होते.

जिम मधील तरुणांना बेकायदेशीरपणे स्टेरॉईड इंजेक्शन विक्री करणाऱ्या दोघांवर गुन्हा दाखल

पुणे । प्रतिनिधी

पुणे शहरातील विविध जिम मधील व्यायाम करणाऱ्या तरुणांना शरीरयष्टी चांगल्याप्रकारे व्हावी



याकरिता स्टेरॉईड इंजेक्शन मेफेटर्मिन सल्फेट इंजेक्शन बेकायदेशीररित्या विक्री केल्याप्रकरणी दोन जणांवर शिवाजीनगर पोलिसांनी कारवाई केली आहे. याप्रकरणी आरोपींवर गुन्हा देखील दाखल करण्यात आला असून आरोपींच्या ताब्यातून पाच हजार रुपयांचे बेकायदेशीर १४ स्टेरॉईड इंजेक्शन जप्त करण्यात आली आहे.

शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रशेखर सावंत यांनी माहिती दिली की, याप्रकरणात दीपक बाबुराव वाडेकर (वय -३२, राहणार- खडकी, पुणे) व साजन अण्णा जाधव (वय- २५, राहणार- औंध ,पुणे)यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत आरोपी विरोधात पोलीस हवलदार तेजस रमेश चोपडे यांनी तक्रार दाखल केलेली आहे.

संबंधित आरोपी हे नतावाडी येथील इराणी वस्तीकडे जाणाऱ्या रस्त्यावर एका कार मध्ये बेकायदेशीर स्टेरॉईड इंजेक्शन घेऊन थांबले असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. सदर आरोपींकडे औषधे बिल नसताना औषध घेणाऱ्या व्यक्तीच्या जीवीतास धोका किंवा आरोग्यास गंभीर इजा होऊ शकते हे माहिती असताना देखील, संबंधित औषधे अवैधरीत्या प्राप्त करून गैरवापर करण्याचे उद्देशाने अनाधिकाराने बेकायदेशीररित्या कब्जात बाळगल्याचे दिसून आले आहे. संबंधित इंजेक्शन त्यांनी कोठून आणली आहेत, ते कोणाला विक्री करणार होते, त्यांचे अन्य साथीदार कोण आहेत, याबाबत पुढील तपास शिवाजीनगर पोलीस करत आहे.

ओतूर येथे बिबट्याच्या हल्यात दुचाकीवरील दाम्पत्य जखमी

ओतूर । प्रतिनिधी

ओतूर, ता. जुन्नर येथील कपर्दिकेश्वर मंदिर ते बाबीत मळा मार्गावर दुचाकीवर हल्ला करून दुचाकीवरील दाम्पंत्याला बिबट्याने जखमी केले असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी लहु ठोकळ यांनी दिली.

संतोष बन्सीधर गिते (वय-४६) आणि योगिता संतोष गिते (वय-३९) (रा. बाबित मळा, ओतूर, ता. जुन्नर) हे असे जखमी दाम्पत्याची नावे आहे. ते शुक्रवारी सायंकाळी साडे सहा वाजे दरम्यान ओतूरवरून घरी बाबीत मळा येथे जात असताना कपर्दिकेश्वर मंदिराच्या पुढे पिंपळगाव जोगा कॉर्नरवर बिबट्याने अचानक हल्ला करून यांना जखमी केले. सदर हल्याबाबत ओतूरचे माजी सरपंच धनंजय डुंबरे यांनी सर्वांना माहिती दिली. जखमी दामंपत्यास ओतूर प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले. येथे डॉ. श्रीहरी सारोक्ते यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. वैष्णवी ठिकेकर यांनी उपचार केले. यावेळी ओतूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी लहु ठोकळ यांच्यासह वनकर्मचाऱ्यांनी जखमीची भेट घेऊन त्यांना बिबट प्रतिबधक लस देण्यासाठी वनविभागाकडून नारायणगाव येथे नेण्यात आले. या भागात ओतूर वनविभागाकडून बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी आधीच पिंजरा लावण्यात आला असल्याची माहिती वनविभागाकडून देण्यात आली. मागील आठवड्यात ता. १३ डिसेंबर रोजी मेघा संदिप शिंदे यांना याच परीसरात दुचाकीवर हल्ला करून बिबट्याने जखमी केले होते. तसेच ता. १२ डिंसेबर रोजी ओतूर शहरातील कातकरी वस्तीजवळ गुरुनाथ किसन वाघ यास सकाळी शौचास बसलेले असताना जखमी केले होते.

पिंपळे सौदागर येथील १८ मीटर डीपी रस्त्याचा शुभारंभ

पिंपरी । प्रतिनिधी

महापालिका आणि लष्कर यांच्यात वाटाघाटी होत नसल्यामुळे रखडलेल्या पिंपळे सौदागर येथील १८ मीटर रस्त्याचा प्रश्न अखेर सुटला आहे. लष्कराने जागा हस्तांतरित केल्यामुळे महापालिकेने रस्ता व लष्कर सीमाभिंतीच्या कामाला सुरुवात केली आहे. आता बीआरटी रोड ते ट्रॉईज सोसायटी पुढे नॅचरल आइस्क्रीम कॉर्नरपर्यंत सुसज्ज रस्ता केला जाणार आहे.

पिंपळे सौदागरचा स्मार्ट सिटीत समावेश झाल्यानंतर संपूर्ण उपनगराचा दर्जेदार विकास करण्यात आला. परंतु, लष्कराच्या हरकतीमुळे १८

मीटर रस्त्याचे काम सुरु करण्यात अडथळे येत होते. १८ मीटर रस्त्यासाठी लागणारी जागा लष्कराकडून ताब्यात घेण्यासाठी विलंब होत होता. माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांनी लष्कर आणि महापालिका यांच्यात समन्वय घडवून आणला. वेळोवेळी पाठपुरावा केल्यानंतर लष्कराने रस्त्यासाठी लागणारी जागा देण्यास होकार दिला. तत्पुर्वी महापालिकेने येथील १८ मीटर रस्ता विकसित करण्यासाठी १४ कोटी रुपये खर्चाची निविदा प्रसिध्द केली होती. जागा ताब्यात नसल्यामुळे तसेच तांत्रिक त्रुटी असल्यामुळे निविदा बरेच महिने रखडली होती. आता जागा ताब्यात आल्यामुळे रस्त्याच्या आणि लष्करी सुरक्षा भिंतीच्या कामाला महापालिकेने सुरुवात केली आहे. या रस्त्याची लांबी ९२० मीटर असून रुंदी १८ मीटर आहे. अत्याधुनिक पध्दतीने रस्ता विकसित करण्यात येणार आहे. दोन्ही बाजुला दोन मीटर रुंद सुसज्ज पदपथ असणार आहेत. एका बाजुला १०५ मीटर रुंदीचा सायलक ट्रॅक असणार आहे. १०५ मीटरचे दोन्ही बाजुला पेव्हींग ब्लॉक बसविण्यात येणार आहेत. या रस्त्यामुळे नाशिक फाटा येथून हिंजवडी आयटी पार्क येथे जाण्यासाठी असणा-या बीआरटी मार्गावर स्वराज गार्डन चौक, गोविंद गार्डन चौक, कोकणे चौक आणि शिवार चौकातील वाहतूक कोंडी कमी होणार आहे. त्यामुळे हिंजवडी अथवा पुण्यात जाण्यासाठी प्रवासाचा वेळ कमी होणार आहे.

नाना काटे यांनी केली कामाची पाहणी

महापालिकेने काम हाती घेतलेल्या १८ मीटर रस्त्याची माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांनी आज बुधवारी (दि. १९) पाहणी केली. त्यांच्यासोबत स्थापत्य विभागाचे उपाभियंता सुनील शिंदे, कंत्राटदार, सल्लागार उपस्थित होते. या रस्त्याच्या निर्मितीसाठी १४ कोटी ८२ लाख ८९ हजार रुपयांची निविदा मंजूर करण्यात आली आहे.